

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी धाकाजी देउगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १४.११.२०२६ | अंक नं. १८९ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



मसूदा मतदारयादीमधून नाव वगळलेल्या मतदारांना पुन्हा संधी : निवडणूक आयोग

अंतिम यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी निर्णय; मृत किंवा दुबार म्हणून नोंद झालेल्यांना पुन्हा अर्ज करता येणार

नगर – विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेदरम्यान अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार म्हणून नोंद झाल्यामुळे ज्यांची नावे मसुदा मतदार यादीत समाविष्ट होऊ शकली नाहीत, अशा मतदारांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करून घेण्यासाठी निवडणूक आयोगाने आणखी एक संधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार, संबंधित मतदारांची मतदान केंद्रनिहाय यादी पुन्हा प्रसिद्ध करण्यात येणार असून, ती मतदान केंद्रे, ग्रामपंचायत भवन, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये तसेच संबंधित प्रशासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध करून दिली जाईल. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावरही ही यादी वगळण्याच्या संभाव्य कारणांसह वाचनीय स्वरूपात प्रसिद्ध केली जाणार आहे.

संबंधित मतदारांना त्यांचे भरलेले मतदार नोंदणी गणना अर्ज सध्याच्या सामान्य निवासस्थानाशी संबंधित निवडणूक नोंदणी अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी यांच्याकडे सादर करता येतील. हे अर्ज प्रत्यक्ष, कुटुंबीयांमार्फत अथवा ॲप व संकेतस्थळाद्वारे ई-साइनच्या सुविधेसह ऑनलाइन सादर करण्याचीही व्यवस्था करण्यात येणार आहे.

मतदारांशी संपर्क साधण्यासाठी बूथ लेव्हल ऑफिसर यांना विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. घरभेटी, शेजारी व कुटुंबीयांकडून चौकशी तसेच उपलब्ध मोबाइल क्रमांक, व्हॉट्सप, ई-मेल आणि एसएमएसच्या माध्यमातून संबंधित मतदारांपर्यंत पोहोचण्यास सांगण्यात आले आहे. यासाठी राजकीय पक्षांच्या बूथ लेव्हल एजंटचेही सहकार्य घेतले जाणार आहे. ज्या मतदारांचे वास्तव्य बदललेले नाही, त्यांना यापूर्वी अर्ज सादर न करण्याचे कारण नमूद करणारे स्वतंत्र निवेदन अर्जासोबत द्यावे लागेल. राज्यांतर्गत अन्य विधानसभा मतदारसंघात स्थलांतर झालेल्या मतदारांना नवीन पत्ता व विधानसभा मतदारसंघाचा तपशील देऊन अर्ज करता येईल. अशा प्रकरणांत स्वतंत्रपणे नमुना ८ भरण्याची आवश्यकता राहणार नाही. बेघर व्यक्तींकडे निवासाचा पुरावा उपलब्ध नसल्यास बीएलओचा प्रत्यक्ष पडताळणी अहवाल ग्राह्य धरला जाणार आहे.

प्राप्त अर्जांची पात्रता, निवासस्थान आणि अन्य आवश्यक तपशीलांची पडताळणी करून नियमानुसार कार्यवाही केली जाईल. अर्ज मंजूर झाल्यास संबंधित मतदाराचा पूर्वीचा क्रमांक पुन्हा देण्यात येणार आहे. यापूर्वीच नव्याने नोंदणीसाठी नमुना ६ सादर केलेल्या मतदारांना पुन्हा गणना अर्ज सादर करण्याची आवश्यकता नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी दिली.

सावेडीत नगरसेवकापाठोपाठ वकिलाच्या घरातून मोठी चोरी

सोन्याचे दागिने, रोकडसह मोटरसायकल पळविली; गुन्हा दाखल

नगर – शहरातील सावेडी परिसरातील चोऱ्या घरफोड्यांचे सत्र थांबता थांबेना, २ दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक बाळासाहेब पवार आणि त्यांच्या शेजाऱ्याच्या घरी भरदिवसा चोरी झाल्याची घटना ताजी असताना आता सावेडीतीलच ऐक्यनगर भागात वकिलाच्या घरात चोरी झाल्याचे समोर आले आहे, चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत सोन्याचे दागिने, रोख रक्कम व घराच्या बाहेर लावलेली मोटारसायकल चोरून नेली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ज्येष्ठ वकील मधुसूदन पांडुरंग गात (वय ६३, रा. ऐक्यनगर, भारत गॅस गोडाऊन जवळ, सावेडी, अहिल्यानगर) यांनी १४ नोव्हेंबर रोजी पहाटे तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे दिवाळी सुट्टीनिमित्त १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता घराला कुलूप लावून बाहेर गावी गेलेले होते. याचा फायदा घेत चोरट्यांनी १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजेपासून ते १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वाजेच्या दरम्यान ऐक्यनगर येथील भारत गॅस गोडाऊनजवळ असलेल्या फिर्यादी यांच्या बंद घराचे गेट व दरवाज्याचे कुलूप तोडले.

त्यांनी घरात बेकायदेशीर प्रवेश करून फिर्यादीच्या घरातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे गळ्यातील मंगळसूत्र, आठ ग्रॅम वजनाचे दोन नग सोन्याचे कानातील टॉप्स, ५० हजार रुपये रोख रक्कम (५०० रुपयांच्या नोटा) आणि घराच्या कंपाउंड मध्ये लावलेली हिरो कंपनीची एक्स्ट्रीम १६० आर ही काळ्या रंगाची मोटरसायकल (क्र. एमएच १६ डीवाय ४१३३) असा मुद्देमाल चोरून नेला.

या चोरीच्या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तोफखाना पोलिसांना कळविले. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य आणि महिला पोलीस उपनिरीक्षक कल्पना चव्हाण तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, श्वान पथक, तसेच ठसे तज्ञांचे पथक दाखल झाले. त्यांनी पाहणी करत पंचनामा केला आहे.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (४), ३३१ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत.

15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER

Career Ki Shuruwat DISHA ke saath

An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE

Get Any Course Just in 2700/-

MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY, BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, HTML.

दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769

जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर.
9371151769

पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, मिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769




नगर रोलिंग शटर
*जुने शटर रिपेरिंग
*गेअर शटर रिपेरिंग
*नवीन शटर मिळेल
(रमेश ढवळे) 7350682390
पत्ता – नगर-अमरधाम, नालेगाव, लोंढे मळा अहिल्यानगर

राष्ट्रसंत आचार्यसम्राट
आनंदऋषिजी म.सा.की कर्मभूमि पर
महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषिजी म.सा. के प्रेरणासे
एवं अर्हम् विज्ञा प्रणेता, महाराष्ट्र केसरी
उपाध्याय प्रवर पूज्य प्रवीणऋषिजी म.सा.के सानिध्य में,
सकल जैन समाज, अहिल्यानगर की ओर से



समाजरत्न सम्मान
श्री. सौरभ प्रमिलाताई हेमराजजी बोरा
एवं




समाज गौरव सम्मान
श्री. अशोक (बाबुशेठ) सिमतरमल बोरा
इनको प्राप्त हुआ ।
आपका हार्दिक अभिनंदन..
- शुभेच्छूक -
आनंद कांतीलालजी कोठारी
एवं समस्त कोठारी परिवार
जामखेड । अहिल्यानगर
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

फेब इंडियन
हेण्डलूम एण्ड हेण्डीक्राफ्ट
आर्ट & क्राफ्ट एक्झीबीशन



आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही दुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे



- चंदेरी आणि पटोरा साडी
- बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स
- पॅच वर्क • पश्चिम बंगाल साडी
- लखनवी चिकन • कोटा सिल्क
- काश्मीर सूट आणि पश्मिना शाल
- जयपुर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी
- भदोई कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट

BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ११.०० ते रा. १०.०० पर्यंत

पार्किंग व एन्ट्री फी
ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक
तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

ना नफा ना तोटा पहिली तीन वर्ष.. कृपया त्याचा फायदा घ्या
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा™
दिवाळी धमाका पॅकेटमध्ये कुकर, दहा किलो पिशवी, आरती संग्रह, पाऊच यांचे रँडमली कुपन

ब्रँडेड कंपनीचा चहा व
रत्नकमल चहा
एक वेळेस जरुर तुलना करुन पहा

इतर कंपन्यांपेक्षा ५० ते ७० रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम..

आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

गुंतवणुकीतून पैसे काढणे : एक कळीचा मुद्दा



राजन कुटे

एखाद्या दुकानदाराचा व्यवसाय अनेक वर्षांपासून चांगला सुरू आहे. दुकानात माल आहे, ग्राहक नियमित येतात आणि व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून घरखर्चही भागतो. पण अचानक काही ग्राहकांची थकबाकी अडकते. नवीन माल खरेदी करायचा असतो आणि त्याच वेळी एखादा अनपेक्षित खर्चही समोर येतो. काही काळासाठी पैशांची चणचण निर्माण होते.

अशा वेळी तो काय करेल? दुकानातील मालमत्ता विकण्याचा किंवा संपूर्ण व्यवसायच बंद करण्याचा विचार लगेच करेल का?

सहसा नाही. तो आधी परिस्थिती समजून घेईल. अडकलेली रक्कम कधी मिळू शकेल, काही खर्च पुढे ढकलता येतील का, उपलब्ध बचतीतून किती भागवता येईल, याचा अंदाज घेईल. गरज पडल्यास मित्र किंवा नातेवाईकांकडून तात्पुरती मदत मिळू शकते का, अथवा बँकेकडून कर्ज घेणं व्यवहार्य ठरेल का, हेही तपासेल.

कारण त्याच्यासाठी दुकान हा केवळ रोज पैसे मिळवण्याचा स्रोत नसतो. त्यामागे अनेक वर्षांची मेहनत, ग्राहकांशी निर्माण झालेला विश्वास आणि भविष्यातील उत्पन्नाची शक्यता असते. त्यामुळे तात्पुरत्या पैशांच्या अडचणीवर उपाय शोधताना तो संपूर्ण व्यवसायाच्या भवितव्याचाही विचार करेल.

म्युच्युअल फंडातून पैसे काढण्याचा निर्णय घेतानाही असाच दृष्टिकोन आवश्यक आहे.

मात्र, इथे एक वेगळेपण आहे. दुकानदाराला त्याचा व्यवसाय, दुकानातील माल आणि त्यात गुंतलेली आपली मेहनत प्रत्यक्ष दिसते. म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीचं स्वरूप तसं नसतं. आपल्या पैशातून अनेक कंपन्यांमध्ये किंवा कर्जरोख्यांमध्ये अप्रत्यक्ष सहभाग निर्माण झालेला असतो. त्या सहभागामागची मालमत्ता आपल्याला रोज दिसत नाही. आपल्या खात्यात युनिट्सची संख्या आणि त्यांचं आजचं मूल्य दिसतं. त्यामुळे रिडेम्पशन म्हणजे फक्त एक व्यवहार, अशी भावना सहज निर्माण होऊ शकते.

पैसे काढण्याची प्रक्रिया सोपी आहे, म्हणून तो निर्णयही तितकाच सोपा असावा असं नाही.

समजा, एखाद्या गुंतवणूकदाराला अचानक मोठ्या खर्चासाठी पैशांची गरज भासते. त्याच्या म्युच्युअल फंड गुंतवणुकीचं मूल्य चांगलं वाढलेलं आहे. अशा वेळी संपूर्ण गुंतवणूक विकून पैसे मिळवणं हा एक मार्ग असू शकतो. पण त्याआधी काही प्रश्न विचारण्यासारखे आहेत. हा खर्च तातडीचा आहे का? संपूर्ण रक्कम आत्ताच लागणार आहे का? काही पैसे उपलब्ध बचतीतून किंवा येणाऱ्या उत्पन्नातून भागवता येतील का? गरज तात्पुरती असेल, तर अल्पकालीन निधी उभारण्याचा दुसरा मार्ग व्यवहार्य आहे का?

अर्थात, मित्रांकडून किंवा नातेवाईकांकडून पैसे घेणं अथवा बँकेकडून कर्ज घेणं हा प्रत्येक वेळी अधिक चांगला पर्याय असेलच असं नाही. कर्जाचा व्याजदर, परतफेडीची क्षमता, कालावधी आणि भविष्यातील आर्थिक बांधिलकी यांचा विचार करावा लागतो. महागडं कर्ज घेऊन गुंतवणूक टिकवून ठेवण्याचा आग्रह धरण्यातही अर्थ नाही. त्याचप्रमाणे, केवळ पैशांची तात्पुरती गरज आहे म्हणून दीर्घकालीन उद्दिष्टासाठी केलेली गुंतवणूक घाईने मोडणंही योग्य ठरेलच असं नाही.

म्हणूनच, उपलब्ध पर्यायांची तुलना करून आपल्या परिस्थितीत कोणता मार्ग अधिक व्यवहार्य आहे, हे ठरवणं महत्त्वाचं ठरतं.

याचा अर्थ रिडेम्पशन टाळावंच असा नाही. काही वेळा गुंतवणुकीतून पैसे काढणं हाच नियोजनाचा अपेक्षित भाग असतो. मुलांच्या शिक्षणासाठी, घरासाठी किंवा निवृत्तीनंतरच्या खर्चासाठी बाजूला ठेवलेला पैसा वापरण्याची वेळ आली असेल, तर त्याचा उपयोग करण्यासाठी युनिट्स विकणं स्वाभाविक आहे. गुंतवणूक करण्यामागे जे उद्दिष्ट होतं, ते साध्य करण्यासाठी पैसा उपलब्ध करून देणं हाच त्या प्रवासाचा हेतू असतो.

काही वेळा आपल्या पोर्टफोलिओची रचना बदलण्याचीही गरज असते. उदाहरणार्थ, इक्विटीमधील गुंतवणूक वाढल्यामुळे एकूण जोखीम आपल्या क्षमतेपेक्षा अधिक झाली असेल, तर रिबॅलन्सिंगसाठी काही युनिट्स विकावी लागू शकतात. एखाद्या योजनेची भूमिका बदलली असेल किंवा आपल्या आर्थिक परिस्थितीत मूलभूत बदल झाला असेल, तर तिचा पुनर्विचार करणंही योग्य ठरू शकतं.

पण बाजारात घसरण झाली म्हणून लगेच पैसे काढून घेणं किंवा एखाद्या दुसऱ्या योजनेने अधिक परतावा दिला म्हणून आपली विद्यमान गुंतवणूक विकणं, या दोन्ही गोष्टींचा स्वतंत्रपणे विचार करायला हवा. त्याचप्रमाणे, नफा दिसतो आहे म्हणून तो लगेच बुक करावा, असाही काही नियम नाही. गुंतवणुकीची कामगिरी हा एक घटक आहे; पण तिची आपल्या उद्दिष्टांशी असलेली सांगड अधिक महत्त्वाची आहे. रिडेम्पशनचा निर्णय घेताना किती रक्कम काढायची, याचाही विचार आवश्यक आहे. संपूर्ण गुंतवणूक विकण्याऐवजी गरजेपुरती काही युनिट्स विकता येतील का, हे तपासता येतं. लागू असलेला Exit Load, युनिट्सची खरेदी तारीख आणि करपरिणाम यांचाही विचार करावा लागतो. कारण योजनेच्या खात्यात दिसणारी रक्कम आणि सर्व लागू खर्च व करांचा विचार केल्यानंतर प्रत्यक्ष उपलब्ध होणारी रक्कम यात फरक असू शकतो. खरं तर, गुंतवणूक करण्यापूर्वी आपण तिचा उद्देश ठरवतो. किती काळासाठी पैसा ठेवायचा आहे, कोणत्या गरजेसाठी तो वापरायचा आहे आणि त्यातून किती जोखीम स्वीकारायची आहे, याचा विचार करतो. मग पैसे काढण्याची वेळ आली की याच गोष्टी पुन्हा तपासणं आवश्यक ठरतं. परिस्थिती बदलली असेल, तर निर्णयही बदलू शकतो; पण केवळ एखादी तात्पुरती अडचण किंवा बाजारातील घडामोड यामुळे दीर्घकालीन नियोजन बाजूला ठेवण्याची गरज नसते.

दुकानदाराला आपल्या व्यवसायाचं महत्त्व माहीत असल्यामुळे तो तात्पुरत्या पैशांच्या अडचणीवर उपाय शोधताना संपूर्ण व्यवसायाचं भवितव्य पणाला लावत नाही. गुंतवणूकदारानेही आपल्या युनिट्सकडे केवळ आज दिसणाऱ्या मूल्याच्या नजरेतून न पाहता, त्या पैशामागचा उद्देश आणि भविष्यातील भूमिका लक्षात घ्यायला हवी.

पैसे काढण्याची सोय असणं आणि पैसे काढण्याची गरज असणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. रिडेम्पशनचा निर्णय या दोघांमधला फरक समजून घेतल्यानंतरच घ्यावा.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध धंद्यांवर पोलिसांची धडक कारवाई; एकाच दिवशी १६ छापे टाकून २ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर आणि व्यावसायिकांवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. १३ नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी विविध पथकांनी १६ ठिकाणी छापे टाकून दोन लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी विविध पोलीस ठाण्यात १६ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्यासाठी विविध पोलीस अंमलदारांचे एकूण पाच पथक तयार करून त्यांना योग्य त्या सूचना व मार्गदर्शन देऊन रवाना केले होते.

१३ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी कर्जत, तोफखाना, राहुरी, पारनेर आणि लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार, दारूबंदी व गुटखा विक्री करणाऱ्या इसमांची गोपनीय माहिती गोळा करून एकाच दिवशी तब्बल १६ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये १६ गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण २ लाख ३ हजार ३३९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची व दाखल गुन्ह्यांची पोलिसांकडील अधिकृत आकडेवारीनुसार, कर्जत पोलीस ठाणे हद्दीत जुगारावर १ कारवाई करून ४३ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तर तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत जुगाराच्या १ गुन्ह्यात ३९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पारनेर पोलीस ठाणे हद्दीत जुगारावर टाकलेल्या छाप्यात ४४ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १ गुन्हा दाखल करण्यात आला. याशिवाय अवैध दारूविक्री विरोधात केलेल्या कारवाईत कर्जत पोलीस ठाणे हद्दीत २ गुन्ह्यांमध्ये ८ हजार ९७० रुपये, राहुरी पोलीस ठाणे हद्दीत ३ गुन्ह्यांमध्ये ७ हजार ७५० रुपये, लोणी पोलीस ठाणे हद्दीत ३ गुन्ह्यांमध्ये २३ हजार ८०० रुपये आणि पारनेर पोलीस ठाणे हद्दीत ४ गुन्ह्यांमध्ये २१ हजार ६८० रुपयांचा दारूसाठा व मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच कर्जत पोलीस ठाणे हद्दीत गुटखा विक्री करणाऱ्या एकावर कारवाई करून १३ हजार ३२९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, तसेच पोलीस अंमलदार अभिजीत अरकल, प्रताप देवकाते, रोहित मिसाळ, भाऊसाहेब काळे, गणेश लोंढे, विशाल तनपुरे, योगेश कर्डीले, अजिनाथ पाखरे, सुयोग सुपेकर, संतोष खैरे, पंकज व्यवहारे, अमृत आढाव, विजय पवार, रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, भगवान थोरात, सुनील मालणकर, अतुल लोटके, विष्णू भागवत, अमोल आजबे आणि प्रकाश मांडगे यांच्या पथकाने केली आहे.

जीवन प्रमाणपत्र सादर करा अन्यथा पेन्शन बंद होईल

नगर – केंद्र सरकार, राज्य सरकार व इतर स्थापनातील पेन्शनरांनी नोव्हेंबर अखेर जीवन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून असे प्रमाणपत्र विहित वेळेत सादर न केल्यास पुढील महिन्यापासून त्यांची पेन्शन बंद होऊ शकते. डिजिटल जीवन प्रमाणपत्र तयार करण्याची सुविधा अहिल्यानगर येथील आय.एस.डी.टी. या संस्थेत उपलब्ध असून सर्व सेवानिवृत्तांनी याचा तातडीने लाभ घ्यावा, असे आवाहन आय.एस.डी.टी. या संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

१६ नोव्हेंबर पासून (रविवार वगळून) ही सुविधा सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत उपलब्ध असून सेवानिवृत्तांनी आपले आधार कार्ड, पेन्शन पे ऑर्डर, बँकेचे नाव, खाते क्रमांक व आधार कार्डला लिंक केलेल्या मोबाईल फोन सह आय.एस.डी.टी., होर्मो केअर लॅब समोर, निर्मल चेंबर्स मागे, लालटाकी, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा.

शासनाच्या नियमानुसार दरवर्षी नोव्हेंबर अखेर सर्व पेन्शनरांनी त्यांचा हयातीचा दाखला बँकेत अथवा संबंधित कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा पुढील महिन्यापासून त्यांची पेन्शन खंडित होऊ शकते. केंद्र सरकार, राज्य सरकार, संरक्षण विभाग, एल.आय.सी., माजी सैनिक, पोस्ट, टेलिफोन, रेल्वे , खाजगी कंपन्या, ईपीएफओ पेन्शनधारक व अन्य आस्थापनांचे सेवानिवृत्त कर्मचारी या सुविधेचा लाभ घेऊ शकतात.

वयोवृद्ध ,आजारी असलेल्या व चालणे अशक्य असलेल्या पेन्शन धारकांसाठी घरी येऊन त्यांचे जीवन प्रमाणपत्र तयार करण्याची सुविधा देखील उपलब्ध असून त्यासाठी प्रथम वेळ ठरवून घेणे आवश्यक आहे. आपली पेन्शन अखंडितपणे सुरू राहण्यासाठी सर्व पेन्शनधारकांनी नोव्हेंबर अखेर आपले जीवन प्रमाणपत्र तयार करून संबंधित कार्यालयात सादर करावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

लालटाकी येथील मिसगर चाळ परिसरात तरुणावर प्राणघातक हल्ला

नगर – शहरातील लालटाकी परिसरातील मिसगर चाळ येथे जुन्या वादातून झालेल्या तुफान हाणामारीत एका तरुणाला लोखंडी फायटर व हत्याराने मारहाण करत गंभीर जखमी केल्याची घटना ९ नोव्हेंबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सात आरोपींसह अन्य काही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील फिर्यादी मुबीन मोहम्मद वसीम शेख (वय ३४, रा. मिसगर चाळ, लालटाकी, अहिल्यानगर) हे आपल्या घराजवळ असताना हा प्रकार घडला. फिर्यादीच्या कुटुंबातील एका महिलेस सुरू असलेल्या वादात मारहाण होऊ नये म्हणून फिर्यादी मध्ये आले होते. याचाच राग मनात धरून आरोपींनी एकत्र येऊन हा हल्ला केला. या प्रकरणी फिर्यादी मुबीन मोहम्मद वसीम शेख यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीच्या या अर्जावरून पोलिसांनी कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींची नावे पोलिसांनी निष्पन्न केली आहेत. त्यात शेख शहानवाज सुलतान उर्फ शन्नो, शेख युसुफ सुलतान उर्फ बाबा, शेख इरफान युसुफ, शेख अबरार युसुफ, शेख सुलतान युसुफ आणि शेख सना शहनवाज अशी सर्व आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी मिसगर चाळ, लालटाकी येथीलच रहिवासी असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या मुख्य सात आरोपींव्यतिरिक्त इतर दोन ते तीन अनोळखी इसम देखील या गुन्ह्यात सहभागी होते.

आरोपींनी एकत्र जमून हातामध्ये लोखंडी फायटर व लोखंडी हत्यारे घेऊन त्यांनी हा हल्ला केला. हल्ल्यादरम्यान फिर्यादीच्या नाकावर, कपाळावर, कानाभोवती व तोंडातील दातास जबर दुखापत करण्यात आली. मारहाण करताना आरोपींनी फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देखील दिली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे पो.हे.कॉ. विलास लोणारे हे करत आहेत.

पद्माकर खेत्रे यांचे दु:खद निधन



नगर – बुरुडगाव रोड भोसले आखाडा येथील रहिवासी पद्माकर (पदू) कोंडीराम खेत्रे (वय ४५) यांचे १४ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, बहीण, भाऊ, चुलत भाऊ, भावजय, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मावा विक्री करणाऱ्या पानटपरी चालकावर कारवाई

नगर– नगर तालुक्यातील देहरे बस स्थानक शेजारील भैरवनाथ पान स्टॉलवर मानवी आरोग्यास अपायकारक असलेल्या माव्याची विक्री करणाऱ्या एका इसमावर पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १ हजार २५० रुपये किमतीचा मावा जप्त केला आहे. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासन सुरक्षा अधिकारी प्रदीप परशुराम मयार यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी ऋषिकेश राजू बागुल (वय २०, रा. देहरे, ता. नगर) याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७४, २७५, १२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्याखालील नियम व कायदे २०११ चे कलम २६(२) (iv) नुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नारायण रच्चा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बागरोजा हडको येथील रहिवासी नारायण रमेश रच्चा (वय ४२) यांचे १४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ भाऊ, भावजया, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दिपक, गणेश व विष्णू रच्चा यांचे ते बंधू होत.

कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांचा टेम्पो पकडला कामरगाव घाटात पोलिसांची कारवाई, दोघांवर गुन्हा दाखल



नगर – कोणतीही खानेसुमारी न देता, अमानुषपणे जखडून कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांचा छोटा हत्ती टेम्पो नगर तालुका पोलिसांच्या पथकाने नगर पुणे महामार्गावर कामरगाव घाटात पकडला असून या कारवाईत ३ जर्सी गायींची सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ नोव्हेंबर रोजी रात्री ही कारवाई करण्यात आली आहे.

स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल विक्रांत भालसिंग व त्यांचे पथक १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी खाजगी वाहनाने नगर–पुणे हायवेवर गस्त घाजत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, टाटा कंपनीच्या पांढऱ्या रंगाच्या छोट्या हत्ती (क्र. एमएच २३ एयु ४२२६) मधून गोवंशीय जातीच्या जर्सी गायी निर्दयतेने कत्तलीसाठी आष्टीकडे नेल्या जात आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कामरगाव गावच्या घाटात सापळा रचला. सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास सदर वाहन आल्याचे दिसताच पोलिसांनी ते थांबवत चालकाची चौकशी केली. चौकशीत वाहनचालकाने त्याचे नाव सागर भाऊसाहेब कोकणे (वय २८, रा. चिखली–हातगाव, ता. आष्टी, जि. बीड) असल्याचे सांगितले. तसेच सदर गायी पारनेर तालुक्यातील लोणी माळवा येथून रेहान कुरेशी (रा. बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे) याने भरून दिल्या असून त्या आष्टी येथे कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली. पोलिसांनी वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये तीन जर्सी गायींना कोणत्याही प्रकारचे अन्न, पाणी व निवारा न देता, वेदना होतील व हालचाल होणार नाही अशा पद्धतीने क्रूरपणे बांधून व जखडून ठेवल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी ३ जर्सी गायी आणि ३ लाख रुपयांचे वाहन असा एकूण ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल पंचनाम्याद्वारे ताब्यात घेतला. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल विक्रांत भालसिंग यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५(ए), ५(बी), ९(ए) आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)(डी) प्रमाणे आरोपी सागर भाऊसाहेब कोकणे आणि रेहाण कुरेशी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार जगदीश जंबे करत आहेत.

ॲड. बाळासाहेब शिंदे यांचे दु:खद निधन



नगर – वरझडी, संगमनेर येथील रहिवासी ॲड. बाळासाहेब सुखदेव शिंदे (वय ६३) यांचे १३ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १४ नोव्हेंबर रोजी संगमनेर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, जावई, नातवंडे, २ भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे.

कचरू चोथवे यांचे दु:खद निधन



श्रीरामपूर – येथील सेवानिवृत्त पीएसआय कचरू दत्तात्रय चोथवे (वय ६४) यांचे १४ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्ययात्रा करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर नगरपरिषदचे कॉन्ट्रॅक्टर शुभम चोथवे व गणेश चोथवे यांचे ते वडील होत.

माणिकबाई पटारे यांचे निधन

श्रीरामपूर – येथील माणिकबाई बबनराव पटारे (वय ६८) यांचे १३ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ज्ञानेश्वर पटारे यांच्या मातोश्री, पोलिस उपनिरिक्षक राजेंद्र गोडगे, संतोष दौंडे, अजित सातपुते, योगेश गोडगे व तुषार लोंढे यांच्या मावशी तसेच गणेश अरुण ठाणगे यांच्या त्या आत्या होत.



चरणदादा चव्हाण यांचे निधन



श्रीरामपूर – श्रीरामपूर न.प.चे माजी उपनगराध्यक्ष व दलित मित्र चरणदादा बाबु चव्हाण (वय ७५) यांचे १३ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, नात, नातू, पुतणे असा परिवार आहे. दिपक चव्हाण यांचे वडील, नगरसेविका सौ.प्रणिती चव्हाण यांचे सासरे होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

शहरात पाण्याचा अपव्यय करणाऱ्या १६ जणांना महापालिकेचा ठोठावला प्रत्येकी १ हजारांचा दंड

सात व्यावसायिकांचाही समावेश: कारवाई आणखी कडक करण्याचा इशारा

नगर – दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरात पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी अहिल्यानगर महापालिकेने दहा टक्के पाणी कपातीची अंमलबजावणी सुरू केली आहे. उपलब्ध पाणीसाठा जपून वापरण्याचे आवाहन करतानाच पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांविरोधात महापालिकेने आता दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. नागरिकांना वारंवार सूचना देऊनही पाण्याची नासाडी सुरूच असल्याने गेल्या आठ दिवसांत तब्बल १६ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. प्रत्येकाला एक हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, यामध्ये सात व्यावसायिकांचाही समावेश असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीमुळे शासनाच्या आदेशानुसार महापालिकेने दैनंदिन पाणी वापरात दहा टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना पाण्याची गळती आणि नासाडी रोखण्यावरही प्रशासनाने भर दिला आहे. घरगुती वापरासह व्यावसायिक ठिकाणीही पाण्याचा अपव्यय होऊ नये, यासाठी नागरिकांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष करून पाण्याचा बेसुमार वापर करणाऱ्यांवर महापालिकेच्या पथकांकडून थेट दंडात्मक कारवाई केली जात आहे.

शहरात पाण्याची नासाडी कुठे होत आहे, नळांना तोट्या नसल्याने पाणी वाहून जात आहे का, तसेच सार्वजनिक ठिकाणी पाण्याची गळती होत आहे का, याची तपासणी करण्यासाठी महापालिकेने विशेष पथके नियुक्त केली आहेत. ही पथके विविध भागांत पाहणी करून पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कारवाई करत आहेत. गेल्या आठ दिवसांत १६ जणांवर प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. यामध्ये दुकानदार, बेकरी, हॉटेल व्यावसायिकांसह अन्य सात व्यावसायिकांचा समावेश आहे.

पाणी बचतीबाबत जनजागृती

पाणी कपातीची अंमलबजावणी करताना केवळ दंडात्मक कारवाईवर भर न देता नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृतीही केली जात आहे. आगामी काळात तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून, पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

दंडात्मक कारवाई सुरूच राहणार– आयुक्त

दुष्काळी परिस्थितीमुळे उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेने दहा टक्के पाणी कपात लागू केली आहे. या उपाययोजनांच्या यशस्वितेसाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे नागरिकांनी कुठेही पाण्याचा अपव्यय करू नये. नळांना आवश्यक त्या तोट्या बसवून घ्याव्यात आणि पाण्याचा जपून वापर करावा. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई सुरूच राहणार असून, आगामी काळात तपासणी अधिक कडक केली जाईल, असे महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

गृहिणी

आरोग्य

व्यसनाच्या अंधारातून प्रकाशाकडे

व्यसन ही आजच्या समाजाला लागलेली मोठी कीड आहे. दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, गांजा यासारख्या पदार्थांच्या आहारी गेल्यामुळे माणसाचे शरीर पोखरले जाते, मन कमकुवत होते आणि घराची राखरांगोळी होते. या व्यसनातून बाहेर पडणे कठीण वाटत असले तरी ते अशक्य नाही, त्यासाठी मनाचा ठाम निश्चय हा सगळ्यात मोठा उपाय आहे. सर्वप्रथम व्यसन करणाऱ्या व्यक्तीने मी हे सोडणारच असा मनाशी पक्का निर्धार करावा. एकदा मनाने ठरवले की निम्मी लढाई जिंकल्यासारखीच असते. त्यानंतर ज्या कारणामुळे, ज्या मित्रांमुळे किंवा ज्या ठिकाणी गेल्यामुळे व्यसनाची आठवण येते, त्या सर्व गोष्टींपासून दूर राहावे. आपले मन इतर चांगल्या कामात गुंतवावे. सकाळी लवकर उठून फिरायला जाणे, व्यायाम करणे, प्राणायाम करणे, मैदानी खेळ खेळणे यामुळे शरीरात नवी ऊर्जा येते आणि व्यसनाची तल्लफ कमी होते. एकटे राहणे टाळावे. आपल्या कुटुंबातील लोकांबरोबर, चांगल्या मित्रांबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवावा. मनात येणारे विचार मोकळेपणाने त्यांच्याजवळ बोलावे. अनेक वेळा राग, चिंता, नैराश्य यामुळे माणूस व्यसनाकडे वळतो, त्यामुळे संगीत ऐकणे, वाचन करणे, बागकाम करणे अशा छंदांमध्ये मन रमवावे. जेव्हा व्यसनाची खूप तीव्र इच्छा होईल तेव्हा पाणी प्यावे, फळ खावे किंवा लवंग, बडीशेप, आवळा तोंडात ठेवावा. जर स्वतःच्या प्रयत्नाने व्यसन सुटत नसेल तर लाज न बाळगता डॉक्टरांचा, समुपदेशकांचा सल्ला घ्यावा. आज अनेक ठिकाणी व्यसनमुक्ती केंद्रे आहेत जिथे योग्य उपचार केले जातात. कुटुंबानेही अशा व्यक्तीला टोचून न बोलता प्रेमाने आणि आधाराने वागवावे. कारण प्रेम आणि आधार हेच त्या व्यक्तीला पुन्हा नव्याने उभे राहण्याचे बळ देते.

पाककला

पालक चीज कॉर्न बॉल्स

साहित्य : बारीक चिरलेला पालक १ वाटी, उकडलेले अमेरिकन कॉर्न १ वाटी, किसलेले चीज १/२ वाटी, उकडलेला बटाटा २ मध्यम, बारीक चिरलेला कांदा १ लहान, बारीक चिरलेली हिरवी मिरची २, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, १/२ चमचा काळी मिरी पावडर, १/२ चमचा चाट मसाला, १/२ चमचा जिरे पावडर, १/४ चमचा गरम मसाला, मीठ चवीनुसार, ब्रेड क्रम्स १ वाटी, कॉर्नफ्लोअर ३ चमचे, मैदा २ चमचे, तळण्यासाठी तेल

कृती : पालक २ मिनिटे गरम पाण्यात ब्लांच करून थंड पाण्यात घाला आणि पिळून बारीक चिरून घ्या. एका मोठ्या भांड्यात उकडलेले बटाटे कुस्करून घ्या. त्यात पालक, कॉर्न, कांदा, हिरवी मिरची, आलं-लसूण पेस्ट, काळी मिरी पावडर, चाट मसाला, जिरे पावडर, गरम मसाला आणि मीठ घालून मिश्रण एकजीव करा. हाताला थोडे तेल लावून मिश्रणाचा छोटा गोळा घ्या, मध्यभागी थोडे चीज भरून बंद करून बॉल तयार करा. मैदा आणि कॉर्नफ्लोअर पाण्यात मिसळून पातळ घोल तयार करा. प्रत्येक बॉल घोळात बुडवून ब्रेड क्रम्समध्ये घोळवून घ्या. १५ मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा. कढईत तेल गरम करून मध्यम आचेवर बॉल्स सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा. तयार बॉल्स टोमॅटो केचप किंवा हिरव्या चटणीबरोबर गरम सर्व्ह करा.

वास्तू

घरासंबंधी...

* घरात रोज शंख वाजवल्याने वाईट शक्ती निघून जाते.
* स्वयंपाकघराची योग्य दिशा आग्नेय आहे. स्वयंपाक करताना गृहिणीचे तोंड पूर्वेला असेल तर घरात आरोग्य चांगले राहते.
* शयनगृहात पलंग शक्यतो नैऋत्य दिशेला असावा.

सौंदर्य

२ चमचे बेसन, चिमूटभर हळद, थोडे दही आणि ४ थेंब लिंबाचा रस एकत्र करून लेप तयार करा. हा लेप चेहऱ्यावर लावल्याने त्वचा एकदम उजळते.

सल्ला

पापड तळताना तेलात थोडे मीठ टाका म्हणजे तेल उडत नाही

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, उ.षा.२३।२९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : आज अचानक धनलाभ होण्याचे योग आहेत.

वृषभ : कौटुंबिक वादातून नाव बाहेर येईल.

मिथुन : नोकरीत बढतीची बातमी मिळेल. दूरच्या प्रवासाचे योग जुळून येतील.

कर्क : आरोग्याच्या तक्रारी वाढतील. खर्चाचे प्रमाण उत्पन्नापेक्षा जास्त राहील.

सिंह : व्यवसायात नवीन मोठा करार होईल. स्पर्धकांकडून दबाव वाढेल.

कन्या : प्रेमसंबंधात गैरसमज निर्माण होईल.

तूळ : कचेरीच्या कामाचा निकाल तुमच्या बाजूने लागेल

वृश्चिक : आजचा दिवस संमिश्र जाईल. घरात एखाद्या मंगल कार्य घेल.


धनु : विद्यार्थ्यांना परीक्षेत अपेक्षित यश मिळेल.

मकर : भागीदारीच्या व्यवसायात नुकसान होईल.

कुंभ : अडकलेले पैसे परत मिळतील. समाजात मान-सन्मान वाढेल.

मीन : नातेवाईकांकडून आनंदाची बातमी मिळेल.

शब्दगंध क्र. ७५५५ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) वन; रान; कांतार; कानन; अरण्य ४) सोडचिठ्ठी; घटस्फोट; काडीमोड ७) वाईट होवो असा उच्चार; शाप ८) उपहास; फजिती ९) ताप येण्यापूर्वीची स्थिती ११) कैफ आणणारा एक पदार्थ १३) बाजार; मंडई; मार्केट १४) रत; गुंग; मग्न; लीन १८) वाकडा नसलेला; नीट १९) एक श्वासरोग २०) रोख; कल २१) विद्येची देवता; सरस्वती; शारदा २३) लवकर न तुटणारे; लवचीक

उभे शब्द :- १) पोटात होणारा एक कृमी २) गळ्यात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना ३) वाईट सवय; खोड ४) कुंपणाचा मोठा दरवाजा ५) किरकिर; डोकेदुखी ६) एक हिंस्र जंगली प्राणी १०) खोडाने ज्यावर गंध उगाळतात तो पसरट दगड ११) एक प्रकारचे वहाण किंवा खेटर १२) एकंदर; निवड न करता १५) नाश पावलेला भाग १६) मळ्यात उत्पन्न होणारा पदार्थ (भाजीपाला वगैरे) १७) वृत्त; वार्ता; बातमी १९) औषध (हिंदी, उर्दू) २०) मोठा प्रवाह (प्रकाशाचा वगैरे); फोकस २२) सावध; हुशार; सजग

शब्दगंध क्र. ७५५४ चे उत्तर

मा	सा	■	श	त	क	■	सं
प	रि	व	र्त	न	■	तं	ग
■	का	का	■	म	ज	बू	त
सा	■	ल	क्ष	णी	य	■	वा
ज	र	त	र	■	ज	ब	र
■	हे	■	■	का	य	दा	■
हि	मा	ल	य	■	का	म	ना
त	न	■	व	जी	र	■	क

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : दुसऱ्याची नक्कल करण्यापेक्षा स्वतःची ओळख निर्माण करा.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

रक्त नेहमी लालच का असते?

आपल्या शरीरात वाहणारे रक्त लाल दिसण्याचे मुख्य कारण त्यात असणाऱ्या असंख्य तांबड्या पेशी हे आहे. या तांबड्या पेशींच्या आत एक लोहयुक्त द्रव्य असते, जे प्राणवायूला स्वतःकडे ओढून घेते आणि संपूर्ण शरीरभर पोहोचवते. जेव्हा आपण श्वास घेतो, तेव्हा हवेतून प्राणवायू छातीतील दोन्ही फुफ्फुसांमध्ये जातो. तिथून तो रक्तात मिसळतो आणि लोहयुक्त द्रव्याबरोबर एकरूप होतो. लोह आणि प्राणवायू एकत्र आले की, त्याला चमकदार लाल रंग प्राप्त होतो. अगदी लोखंडाला गंज लागल्यावर जसा तांबूस लाल रंग येतो, तसाच प्रकार इथे घडतो. हृदयातून निघून शरीराच्या कानाकोपऱ्यात जाणारे रक्त प्राणवायूने पूर्ण भरलेले असते, म्हणून ते अगदी ताजे आणि तेजस्वी लाल दिसते. तर शरीरातील सर्व भागांना प्राणवायू देऊन परत येणारे रक्त थोडे गडद लाल दिसते, कारण त्यातील प्राणवायू कमी झालेला असतो. पण ते कधीही निळे नसते. आपल्या त्वचेखालील शिरा निळ्या दिसतात, म्हणून अनेकांना वाटते की आतले रक्त निळे असेल, पण ते खरे नाही. त्वचेमुळे आणि उजेडाच्या खेळामुळे त्या निळ्या दिसतात. रक्तात तांबड्या पेशींची संख्या खूप जास्त असते आणि पांढऱ्या पेशींची संख्या त्यांच्या मानाने खूपच कमी असते, म्हणून पांढरा रंग झाकला जाऊन लाल रंगच वरचढ ठरतो. जर शरीरात तांबड्या पेशी कमी झाल्या, तर माणसाचा चेहरा फिकट पडतो, थकवा येतो आणि अशक्तपणा जाणवतो. यावरूनच कळते की, रक्ताचा लाल रंग हा केवळ दिसण्यासाठी नसून तो आपल्या जगण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राणवायूच्या वाहतुकीचे प्रतीक आहे.

दोन घडे

एका माणसाकडे पाणी आणायला दोन घडे होते. एक घडा चांगला होता, दुसरा थोडा फुटलेला होता. रोज पाणी आणताना फुटलेल्या घड्यातून थोडं थोडं पाणी वाटेत सांडायचं. चांगला घडा त्याला हसायचा.एक दिवस फुटलेला घडा दुःखी होऊन म्हणाला, मालक, मला फेकून द्या, मी अपूर्ण आहे.मालक हसून म्हणाला,

वाटेकडे बघ! तुझ्या बाजूला किती सुंदर फुलं आलीत. तुझ्यातून सांडलेल्या पाण्यामुळेच ती फुलली आहेत.

बोध –

आपल्यातील कमतरता सुद्धा कधी कधी दुसऱ्यांसाठी फुलं फुलवू शकते.

आत्मशक्ति



कारण ह्या मंडळात स्थूल शरीराचा तेवढा अडथळा नसतो. आपल्या मनात विचार केव्हाच आपण सूक्ष्म शरीरात एका जागेवरून दुसऱ्या जागी सहज जातो व एखाद्याबरोबर दुसऱ्या हा क्रमा आपल्या इच्छा पुन्हा एका ठोक्याने कोणाही देखून हे आध्यात्मिक मंडळ नाहीत आणि म्हणून येथे आपला असंख्य आकर्षणे अंतरीव ज्योतिर्मय मंडळांची यात्राआणि आनंदात अस्तित्व हरवून बसतो, संत महात्मे आपल्याला

अध्यात्मिक शक्ती

शिकवतात हा मंडळात हवेत ब्रम्हणापासून वाचवितात. ते त्यांच्या आत्म्यांना अस्तित्व वरीष्ठ मंडळात नेतत आणि त्यांना सूक्ष्म मंडळाच्या आकर्षणापासून दूर ठेवतात. सूक्ष्म मंडळानंतर आत्मा कारण मंडळात प्रवेश करतो. ह्या मंडळाच्या आपल्या स्वतःच्या खास प्रकारच्या ज्योती आणि शब्द ध्वनी आहेत व त्या सूक्ष्म मंडळातील तेज आणि शब्दापेक्षा अधिक तेजस्वी आणि अधिक मधुर असतात. ह्या मंडळात तेव आणि कारण शरीर आणि कारण मनाचे कार्य करतो. संत मंडळातील शरीर व मनाच्या येथील शरीर व मन अधिक सूक्ष्म आणि अधिक शक्तिशाली रित्या पावलेले असते. तसेच येथे एक अदृश्य वावे आहे आणि ती म्हणजे कालच्या किती मोठे. वरिष्ठत्व येथे एक अदृश्य वावे आहे आणि ती म्हणजे कालच्या किती मठाच्या कामाची माहिती होते. पण हा सूक्ष्म आत्म्याच्या दृष्टीने थोडा आहे. येथे मन हा खूपच शक्तिम न असते व आम्ही त्याच्या ज्ञानाचे अडथळे पडतो.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

नाती घट्ट विणू या

आता या विषयाकडे आध्यात्मिक बाजूने बघू या. अध्यात्म आपल्याला सांगतं की प्रत्येक आत्म्याचं एक कार्मिक खातं असतं. भलेही वर्तमान जीवनात दोन आत्म्यावर समान कष्ट घेतले तरी त्याचा परिणाम समान असणार नाही. याचं कारण त्यांचे संस्कार आणि पूर्वजन्म ाची कर्म वेगवेगळी आहेत आणि ह्या दोन्ही गोष्टी त्यांच्या नशिबावर प्रभाव पाडतात. प्रत्येक आत्म्याकडे यश मि ळवून देणारे घटक वेगवेगळे असतील तर आयुष्याला स्पर्धा समजणं कितपत योग्य आहे? प्रत्येकाचाच प्रवास वैशिष्ट्यपूर्ण! काही मुलं खूप कष्ट करतात पण तरी त्यांचा निकाल चांगला लागत नाही आणि काही मुलं खूप कष्ट न घेताही चांगल्या मार्कांनी पास होतात. व्यवसायातही हेच होतं. सुरेश ओबेरॉय : जेव्हा मी फिल्म स्कूलमध्ये शिकत होतो तेव्हा सगळे म्हणायचे की, माझ्या वर्गामि त्रांना लवकर कामं मिळतील पण मला काम मिळणं अवघड होईल. पण प्रत्यक्षात, माझ्या वर्गात ज्याला सर्वात पहिल्यांदा काम मिळालं तो मी होतो.

शिवानीदीदी : जेव्हा आपण एखाद्याची परीक्षा घेतो – मग ती कामगिरी, कौशल्य, दिसणं कशाही बाबतीत असली तरी, ती आपण त्या वेळेस ठरलेल्या मापदंडानुसार घेतो. ती व्यक्ती काय करण्यास समर्थ आहे आणि काय करण्यास नाही हे आपण त्यानुसार ठरवतो. तुम्ही म्हणालात की तुमच्या बाबतीत लोकांच्या अपेक्षेच्या अगदी उलट झालं. सगळ्यांसाठीचे मापदंड सारखेच होते तरीही निकाल अपेक्षेपेक्षा वेगळा कसा काय लागला? आणि हे काही फक्त तुमच्या सोबत झालं असं नाही तर अशी अनेक लोकं असतात. एक गृहीत धरू या. एकाच मापदंडात तोलल्या जाणाऱ्या दोन व्यक्ती. असं समजा की ती एकसारखी जुळी मुलं आहेत.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या : वेटर, या भाजीमध्ये माशी पडली आहे!

वेटर : हो सर, पण काळजी करू नका... ती भाजी जास्त पिणार नाही, शेवटी ती लहानच आहे!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्य कार्यालय कोठे आहे?

– न्यूयॉर्क शहरात

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

साहित्य सहवास - 'कृतघ्नतेकडुन...'

त्या खाजगी कंपनीतील आदर्श कर्मचारी पुरस्कार वितरणाकरिता मी प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित राहिलो. मॅनेजर साहेबांनी माझा सन्मान केला. कंपनीविषयी साहेबांनी माहिती सांगितली. आमच्यासमोर जवळपास शंभरपेक्षा अधिक कर्मचारी बसलेले. पैकी दोघांची नावं आदर्श कर्मचारी म्हणून पुकारली. पहिला कर्मचारी माझ्या हस्ते पुरस्कार घेऊन त्याच्या जागेवर जाऊन बसला. दुसरा कर्मचारी पुरस्कार घेण्यासाठी येऊ लागला. त्याच्याआधी एक कर्मचारी मॅनेजर साहेबांजवळ येऊन म्हणाला, मला थोडसं मनोगत व्यक्त करु द्या. मॅनेजर साहेबांनी परवानगी दिली. सदर कर्मचारी माईकजवळ उभा राहुन बोलु लागला. आदर्श कर्मचारी पुरस्कार आत्ता स्वीकारलेल्या कर्मचाऱ्याचे अभिनंदन. दुसऱ्या आदर्श कर्मचाऱ्याबद्दल मी आत्ता बोलणं गरजेचं आहे. मॅनेजरसाहेब, मी तुमची माफी मागतो परंतु दुसऱ्या आदर्श कर्मचाऱ्याबद्दल मी बोललंच पाहिजे.

हे बोलणं फक्त माझ्या मनात नाहीय तर काही कर्मचाऱ्यांच्या मनात आहे. त्यांच्यावतीनेही मी बोलणार आहे. मॅनेजरसाहेब, सकाळी आल्यावर तुम्ही तासभर इथं थांबता. तुमची कामं झाली की दुसऱ्या कंपनीतही तुम्ही, दिवसभर तुमची जबाबदारी, कर्तव्ये पार पाडता. पण इथं हा आदर्श कर्मचारी स्वतःची कामं, माझ्यावर ढकलतो आणि स्वतःची खाजगी कामं करण्यासाठी कंपनी बाहेर जातो. त्याचे किराणा मालाचे दुकान आहे हे तुम्ही ओळखता. तो किराणा माल घेऊन, आठवड्यातुन दोन वेळा तरी घरी नेऊन देतो. तसेच त्याची एजन्सीही आहे बचतीची. त्या खातेदारांकडे जाऊन, ऑफिस वेळेमध्येच जाऊन, पैसेही आणतो, त्या संस्थेत भरतो. शिवाय लग्नकार्य, आणखीही काही वैयक्तिक कामं हा आदर्श कर्मचारी, कंपनीच्या वेळेतच करतो. कंपनीत असेल तर फोनवरंच बोलणं तर खूपच वेळ चालु असतं. अशा कर्मचाऱ्याला तुम्ही आदर्श कर्मचारी पुरस्कार कसा देऊ शकता ? जिथं माझं कुटुंब पोट भरतं तिथंच मी अप्रामाणिक असेल तर मी विचार करणं क्रमप्राप्त आहे. हा कर्मचारी आदर्श आहे, हे तुम्ही कसे ठरवु शकता ? तुम्ही सांगितलेली काही कामं तो माझ्याकडुनच करुन घेतो स्वतः केलीत असं दाखवतो. हा माझ्यावर अन्याय नाही का ? आपली कंपनी,कर्मचाऱ्यांना चहाचं बील देते.

हा कर्मचारी चहा न पिता ते पैसे घेतो हे कितपत योग्य आहे ? आणखीही काही गोष्टी सांगता येतील पण मी इथेच थांबतो कारण आदर्श हा विचार आणि आचार असावा, प्रामाणिकपणे काम केलेल्या कर्मचाऱ्याला आदर्श म्हणता येईल. अशा ह्या कर्मचाऱ्याला आदर्श पुरस्कार देणं म्हणजे अप्रामाणिकपणाचा गौरव, वाईटाचं समर्थन करणं असं होईल. सदर कर्मचारी जागेवर जाऊन बसला. मॅनेजर साहेबांचा चेहरा रागाने लालबुंद झाला. दुसरा आदर्श कर्मचारी पुरस्कार जाहिर झालेला कर्मचारी खाली मान घालुन खुर्चीवर बसलेला. मॅनेजर साहेबांना मी म्हणालो सर, ह्याकर्मचाऱ्याला स्टेजवर येऊन प्रामाणिकपणे कबुल व्हायला सांगा. मॅनेजर साहेबांनी सदर दुसऱ्या आदर्श कर्मचाऱ्याला बोलावलं. माईकवर बोलायला सांगितलं. सदर कर्मचारी व्यासपीठावर आला. रडु लागला.

पहिला आदर्श कर्मचारी पुरस्कार स्वीकारलेला कर्मचारी व्यासपीठावर आला. माईकजवळ उभा राहुन म्हणाला, आपण जिथं पोट भरतो, तो आपल्यासाठी देवायलय असतं. देवालयात आल्यावर शंभर टक्के तन-म नाने कामाशी एकरुप, एकनिष्ठ व्हायला हवं. कधीतरी एखादे, दुसरे वेळी खाजगी कामासाठी जाणं वेगळं आणि वारंवार जाणं वेगळं. आपण, आपलीच प्रतारणा का करायची? वाईट कधीच चांगल्याची बाजु घेऊ शकत नाही. आदर्श कर्मचारी पुरस्कार प्राप्त एवढं बोलुन जागेवर जाऊन बसला. मॅनेजर साहेबांनी ह्या दुसऱ्या कर्मचाऱ्याला बोलण्यासाठी खुणावलं. त्याने डोळे पुसले. माईकजवळ उभा राहिला.

म्हणाला, मॅनेजर साहेब आणि मित्रांनो, मला माफ करा. मी खरंच अत्यंत चुकीचं वागतोय हे आता मला प्रकर्षाने जाणवलंय. कंपनीच्या वेळेतच मी, माझी खाजगी कामं करतोय हे चुकीचं करतोय मी. आत्ता आपला आदर्श कर्मचारी पुरस्कारप्राप्त म्हणाला की आपण जिथं पोट भरतो, ते आपल्यासाठी देवालय असतं. खरं तर हा असा चांगला विचार माझ्या मनात कधीच आला नाही. आजपासुन मी स्वतः ला संपूर्णपणे चांगल्या अर्थाने बदलवणार आणि खाजगी कामं कंपनीतुन घरी गेल्यावर करणार. तो कर्मचारी जाऊन बसला. मॅनेजर साहेबांनी आणि मी मनोगत व्यक्त केले. कर्मचारी येथुन गेले. ज्याने खरं रूप सांगितलं तो कर्मचारी मॅनेजर साहेबांजवळ आला. म्हणाला, 'प्लॅन सक्सेसफुल.' मॅनेजर साहेब म्हणाले, मी आणि ह्याने मिळुन हा प्लॅन केला होता कंपनीच्या भल्यासाठी. (लेख क्र.६२६)

– सुनील राऊत माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

४) साखर तपासणी : गर्भवती स्त्रीच्या चयापचय प्रक्रियेमध्ये बदल होऊन रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. ही तपासणी करण्यासाठी गर्भवती स्त्रीला ७५ ग्रॅम ग्लुकोज पिण्यास द्यावे. ही तपासणी साधारणतः गर्भवती स्त्रीचे सहा महिने पूर्ण झाल्यानंतर करावी व ज्या स्त्रियांच्या घरामध्ये मधुमेहाचा इतिहास आहे, ज्यांचे वजन खूप वाढले आहे, जिला खूप घाम येऊन दुर्गंधी येते, ज्या स्त्रीच्या अंगावर सूज येत आहे. अशा गर्भवती स्त्रीची ही तपासणी कधीही करावी व त्याच बरोबर सुरुवातीला प्रथम तपासणीस आल्यावरही करावी. ज्या स्त्रीमध्ये साखरेचे प्रमाण १३५ ग्रॅम पेक्षा जास्त येईल त्या स्त्रीला गर्भावस्थेत व प्रसूती अवस्थेत धोका निर्माण होऊ शकतो. म्हणून निरोगी गर्भारपण व बाळंतपण पार पडण्यासाठी वेळीच ही तपासणी करून घ्यावी. जर गर्भवती स्त्रीच्या शरीराम ध्ये साखरेचे प्रमाण १३५ ग्रॅम पेक्षा जास्त असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आहारामध्ये योग्य ते बदल करून घ्यावा व औषधी उपाय योजना करून घ्यावी.

५) हिपॅटायटिस बी :

गर्भवती स्त्रीला हिपॅटायटिस बी ची लागण झालेली असेल, तर प्रसूती नंतर बाळाला त्याची लागण होऊ नये किंवा झाली तर त्याच्यामध्ये प्रतिकारशक्ती निम र्ण होण्यासाठी बाळाला लस देणे आवश्यक असते; म्हणून गर्भावस्थेमध्ये हिपॅटायटिस बीची तपासणी करणे गरजेचे असते. वरील सर्व रक्ततपासण्या एकदाच करून घ्याव्यात- गर्भावस्थेत फक्त गरजेनुसार हिमोग्लोबीनचे प्रमाण दोन वेळा तपासावे.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या प्रातिनिधिक स्वरूपात निमंत्रित सभासदांना १० टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी संस्थापक चेअरमन वसंत लोढा आदी.

पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या सभासदांना लाभांश वाटपाचा शुभारंभ

नगर – पंडित दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३६ वर्षाच्या कालावधीत सभासद व कर्जदारांना उत्तम व वेळेत सेवा देत आहे. कमी कर्मचारी संख्या असून देखील समाधानी ग्राहक व नेहमीच प्रगतीचा आर्थिक आलेख उंचावत असल्याने आजच्या कार्यक्रमाचे निमंत्रण हे आम्ही स्वतःचे भाग्य व सन्मान समजतो, असे मत लाभांश वाटप प्रसंगी सभासदांनी व्यक्त केले.

दरवर्षीप्रमाणे पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या प्रातिनिधिक स्वरूपात निमंत्रित सभासदांना २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता १० टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा, संचालक अनंत होशिंग, किशोर गांधी, सभासद धनंजय तागडे, बाळासाहेब भुजबळ, सुरज अग्रवाल, गोकुळ काळे, मिलिंद कोलते, व्यवस्थापक निलेश लाटे, सह व्यवस्थापक सुखदेव दरेकर, उमेश मेरगु, गणेश जंगम, अजय आडेप आदी उपस्थित होते.

चेअरमन वसंत लोढा यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सभासदांचा भक्कम पाठिंबा,सर्व संचालकांचे पाठबळ व संस्थेचे सर्व कर्मचारी यांचे उत्कृष्ट कार्य यामूळे पंडित दीनदयाळ पतसंस्थेची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. सभासदांचा संस्था व संचालक मंडळावर असलेला दृढ विश्वास यामुळे पतसंस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेच्या माध्यमातून संस्थेच्या कार्याचा नावलौकिक महाराष्ट्रात होत आहे.संस्थेने आर्थिक प्रगती सोबत सामाजिक कार्यातही पुढाकार घेतला आहे. सभासदांचा हिताचा विचार करता संस्थेने १०% लाभांश वाटप करण्यात आले आहे, असे चेअरमन वसंत लोढा यांनी सांगितले.

सूत्रसंचालन किशोर गांधी यांनी केले. अनंत होशिंग यांनी आभार मानले.

नगर येथील भरत तोडमल यांचे परदेशात एमबीबीएस परीक्षेत यश



नगर – नगर तालुक्यातील जेऊर (तोडमलवाडी) येथील भरत सोपान तोडमल यांनी एमबीबीएस परीक्षेत यश संपादन केले आहे. त्यांनी उजबेकिस्तान-मधील समरकंद स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटी येथून आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले.

भरत हे शीतल व सोपान गेनू तोडमल यांचे चिरंजीव आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करण्याचे स्वप्न साकार केले. त्यांच्या या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

अहिल्यानगरमध्ये १६ नोव्हेंबरपासून यौगिक शुद्धीक्रिया-शंख प्रक्षालन वर्ग

नगर – योगविद्या धाम, नगरतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या अनेकविध आरोग्य विषयक उपक्रमांतर्गत शंख प्रक्षालन या पचन मार्गाच्या अतिशय परिणामकारक अश्या शुद्धीक्रियेच्या बॅचेस १६ नोव्हेंबरपासून सुरू होत आहेत, अशी माहिती अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी दिली.

पचनाच्या समस्या, बद्धकोष्ठता, ऍसिडिटी, वाढते वजन, आळस, शरीराचे जडत्व, इत्यादी अनेक विकारांवर प्रभावी उपाय म्हणजे यौगिक शुद्धीक्रिया.. शंख प्रक्षालन वर्ग आहे. एका बॅचमधे साधारणपणे २० साधकांचा आठवडाभर योगाभ्यास करून घेतला जातो व त्यानंतर रविवारी प्रॅक्टिकल होते. हे वर्ग सकाळी ६ ते ७ व ७ ते ८.या वेळेत राम जमना बंगला, गिते हॉस्पिटल जवळ, बालिकाश्रम रोड, व योग भवन, कुष्टधाम रोड, भिस्ताबाग जवळ, सावेडी येथे घेतले जाणार आहेत. याचा फायदा घ्यावा, असे आवाहन धर्मेंद्र सोनगरा यांनी केले आहे.

प्रेरणादायी अक्षरधन

व्यवहारात समजुतदारपणा हवा





एका तळ्यात हंस जलक्रीडा करीत होते. तिथे नळराजा आला. त्याने एक हंस पकडला. त्या हंसावर कठीण प्रसंग ओढवला. इतर हंस त्याच्या मदतीला येतील, असे त्याला वाटले. पण इतर हंस भ्याले, आणि दूर पळाले. हे वर्णन करताना कविराज रघुनाथ पंडित म्हणतात,

कठीण समय येता कोण कामास येतो ? पण हे पक्ष्यांच्याच बाबतीत घडते? कवीला हंसाचे निमित्त करून माणसांचीच प्रवृत्ती दाखवायची आहे. मित्र संकटात सापडला, की इतरांनी पोबारा केलाच आणि संकटात सापडलेल्याला सोडून पळायची प्रवृत्ती आजचीच का आहे? ती सनातन प्रवृत्ती आहे माणसाची.

इंद्र, देवांचा राजा, इंद्र त्यांच्यासाठी लढला. प्रसंगी प्राणांवर बेतले त्याच्या, तरी तो नाही डगमगला. पण त्या इंद्रावरच एकदा कठीण प्रसंग आला. तेव्हा इंद्र म्हणतो,

अवर्त्या शुन आन्त्राणि पेचे।
न देवषु विविदे मार्डितारम ।
अपश्यं जायाममहीयमानामघा ।
मे श्येनो मध्वा जभार ।।

वाईट दिवस आले, तेव्हा मला कुत्र्याची आतडी शिजवून खावी लागली. माझ्या पत्नीला दारोदार भीक मागत हिंडावं लागलं. पोटासाठी. अपमान झाला तिचा कित्येक ठिकाणी. पण देवांमध्ये एकही नाही निघाला असा, की ज्याला आली माझी दया. सगळे सुखाचे साथी. पण अशा वेळी जो सर्वत्र संचारी, जो गगनात भरारी, पीडितांचे दुःख हारी, असा श्येन माझ्याकडे आला. त्याने मला स्फूर्ती दिली. उत्साह दिला. साक्षात मधु आणला त्यानं माझ्यासाठी. तो एकच आहे सर्वांचा कैवारी.

ज्ञानेश्वर माउली म्हणते, मी माझे म्हणता संसारी गुंतले। तव परत्र परतेचि राहिले ।। हे ना म्हणउनि तया झोंबिन्नले। तव सिद्ध सिद्ध हातीचे गेले। पुढीला चुकला, मागिला मुकला। तैसी परी जाली माते।। आपआपणाते गोवित बुद्धी। दोष ठेवी कवणाते रया।। बाप रखुमादेवीवरा विठ्ठल ध्याईजे। तरी सकळिक होईल आपैते।

मी सगळ्यांना माझे म्हणून जवळ केले. पण प्रसंग येताच परके ते परकेच ठरले. ते दूर सरले, पण मी त्यांना जाऊन चिकटलो, तर जवळ होते तेही गमावून बसलो. आता भविष्य कुठले? भूतकाळातला तर मुकलोच मागे, आपले आपले म्हणून दुर्बुद्धी झाली. कुणीच माझे न झाले. कुणाला दोष द्यायचा बरे? ही जनरीच. हे सोडावे, कारण हे वेगळे. जवळ करा ते विठ्ठलरूप सावळे. मग साधेल सगळे.

इंद्र म्हणतो.

तसे सगळे देव निष्ठुर होते ? सगळी माणसे कृतघ्न असतात? आपल्यावर आपत्ती ओढवली, त्याला ते जबाबदार असतात? त्यांच्याही काही अडचणी असू शकतात. आपण त्यांना समजून घेतले पाहिजे. श्येनाने इंद्रासाठी हाच विचारमधू आणला होता. म्हणूनच इंद्राने देवांशी शत्रुत्व ठेवले नाही. झटला तो पुन्हा त्यांच्या भल्यासाठी. माणसे दुबळी असतात. परिस्थितीने गांजलेली असतात. तुमच्याबद्दल सहानुभूती नसते असे कोण म्हणते? पण त्यांची अगतिकता त्यांना तुमच्यापासून नेते. व्यवहारात समजूतदारपणा असावा.

– किशोर गांधी

आविष्कार २०२६-२७ संशोधन स्पर्धेत आयबीएमआरडीच्या चार प्रकल्पांची विद्यापीठ स्तरावर निवड

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट (आयबीएमआरडी), अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आविष्कार २०२६-२७ क्षेत्रीय स्तरावरील संशोधन प्रकल्प स्पर्धेत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या गौरी खेत्रे, वैष्णवी कोठावळे, प्रथमेश भोई, ऋषी साळवे आणि ओम राठोड पदवी स्तरावरील आणि कृष्णा माताडे पदव्युत्तर स्तरावरील अशा एकूण चार संशोधन प्रकल्पांची विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही माहिती संस्थेचे संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांनी दिली.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी ई-वेस्ट, सोशल मीडिया मार्केटिंग, ऑटोमोबाईल डीलरशिपसाठी इव्हेंट मॉडेल, त्रिनेत्र रोबोटिक स्काउट आणि बनाना फायबर यांसारख्या नावीन्यपूर्ण विषयांवर संशोधन प्रकल्प सादर केले. या प्रकल्पांमधून विद्यार्थ्यांनी सामाजिक समस्या, तंत्रज्ञान आणि व्यावसायिक क्षेत्रातील विविध आव्हानांवर संशोधनात्मक दृष्टिकोन मांडला. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन मिळावे, तसेच विविध क्षेत्रांत गुणवत्तापूर्ण संशोधन घडावे, या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत आविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. स्पर्धेत आयबीएमआरडीच्या सहा विद्यार्थ्यांनी चार प्रकल्पांच्या माध्यमातून यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट (आयबीएमआरडी), अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आविष्कार २०२६-२७ क्षेत्रीय स्तरावरील संशोधन प्रकल्प स्पर्धेत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य विश्वस्त व सीईओ डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिजित दिवटे तसेच तांत्रिक संचालक सुनील कल्हापुरे यांनी यशस्वी विद्यार्थी आणि त्यांचे प्रकल्प मार्गदर्शकचे अभिनंदन केले. तसेच आगामी विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांच्या प्रोत्साहन व मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रेरणा मिळाली. तसेच अक्कॅडमिक रिसर्च कोऑर्डिनेटर प्रा. डॉ. मेघा जैन यांनी स्पर्धेचे नियोजन, समन्वय आणि प्रकल्प सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



एमआयडीसी येथील महावीरा टीव्हीएसने तब्बल २५१ गाड्यांची एकाच दिवसात विक्री करण्यात आली.

'महावीरा टीव्हीएस' मध्ये एकाच दिवसात २५१ गाड्यांची विक्री

नगर – दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसी येथील महावीरा टीव्हीएसने तब्बल २५१ गाड्यांची एकाच दिवसात विक्री करत ग्राहकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाची मोहोर उमटवली आहे. शोरूममध्ये वाहन खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी झाली होती आणि आकर्षक ऑफर्स, दर्जेदार वाहने अन् ग्राहकांच्या विश्वासामुळे शोरूममधील दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला. महावीरा टीव्हीएसकडून पाच हजार ९९९ रुपयांपासून डाउन पेमेंट, दोन हजार ते वीस हजार रुपयांपर्यंत डिस्काउंट, गाडी खरेदीवर हमखास भेटवस्तू तसेच लकी ड्रॉमध्ये वॉशिंग मशीन, स्मार्ट टीव्ही, स्मार्टफोन, इंडक्शन स्टोव्ह आणि चांदीचे नाणे जिंकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून मिक्सर किंवा सिलिंग फॅन मोफत भेट देण्याचीही खास ऑफर देण्यात आली आहे. ज्युनिअर १२५ ड्युअल टोन, आयक्युब एसटी इलेक्ट्रिक, एनटॉर्क १५०, रायडर, रेडियन, अपाचे आणि रोनिन या टीव्हीएसच्या लोकप्रिय मॉडेल्सना ग्राहकांची विशेष पसंती मिळाली असून २५१ गाड्यांची विक्री हा केवळ विक्रीचा आकडा नसून महावीरा टीव्हीएसवर अहिल्यानगरकरांनी दाखवलेल्या विश्वासाची पावती असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शोरूम नगर-मनमाड रोड, सिद्धी लॉन्सजवळ, सह्याद्री चौक, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे असून अधिक माहितीसाठी ८६२५०९०७०७ किंवा ९८००७२१२१२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर साई श्याम पी.व्ही. येथे ३१ प्युअर ईव्ही इलेक्ट्रिक दुचाकींची विक्रमी विक्री



नेवासा – इंधनाच्या वाढत्या किमतींना पर्याय म्हणून इलेक्ट्रिक दुचाकींकडे ग्राहकांचा कल वाढत असतानाच दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर नेवासा येथील साई श्याम पी.व्ही. येथे प्युअर ईव्ही इलेक्ट्रिक दुचाकींना ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला आहे. शेतकरी, व्यावसायिक आणि नागरिकांनी इलेक्ट्रिक वाहनांना पसंती देत एकाच दिवसात तब्बल ३१ दुचाकींची विक्रमी खरेदी केली. प्युअर ईव्हीच्या दुचाकींमध्ये तब्बल २११ किलोमीटरपर्यंत प्रवासक्षमतेचा दावा, आधुनिक तंत्रज्ञान, आकर्षक रचना आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा ही प्रमुख वैशिष्ट्ये ग्राहकांना आकर्षित करत असल्याने या दुचाकींना पसंती दिली आहे. ई-प्लुटो ७ जी सीएक्स, ई-प्लुटो ७ जी, ई-प्लुटो ७ जी प्रो, ई-प्लुटो ७ जी मॅक्स, निओ एन्ट्रन्स एसएक्स, निओ एन्ट्रन्स प्लस, इको ड्राफ्ट आणि इको ड्राफ्ट ३५० अशा विविध मॉडेल्सना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून पेट्रोलच्या खर्चातून बचत आणि आधुनिक प्रवासाचा उत्तम पर्याय म्हणून या वाहनांकडे पाहिले जात आहे. ग्राहकांसाठी दिवाळी सवलतीचा शेवटचा टप्पा सुरू असून वाहनांच्या एक्स-शोरूम किमतीवर ५ ते ८ टक्क्यांपर्यंत भरघोस सवलत मिळविण्याची संधी उपलब्ध आहे, तसेच प्रत्येक वाहन खरेदीवर हमखास भेटकूपन आणि प्रथम ते पाचव्या क्रमांकापर्यंत आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधीही देण्यात आली आहे.

दरम्यान, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांमध्ये प्युअर ईव्हीची अधिकृत विक्रेतेपद घेऊ इच्छिणाऱ्या नवउद्योजकांसाठीही व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी साई श्याम पी.व्ही., गांधी विकास फर्निचर शेजारी, नेवासा-नेवासा फाटा रोड येथे किंवा सिमरन सुभाष विखोना (९७६७११९०९९ / ७३८७४१९९९९) व प्रिती सिमरन विखोना (८६६८८५४०६१ / ७३८९३८९३९३) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



एसएमएल महिंद्रा पाटील मोटर्समध्ये एकाच दिवशी तब्बल सहा ट्रकची विक्रमी विक्री झाली आहे.

एसएमएल महिंद्रा पाटील मोटर्सची एकाच दिवशी सहा ट्रकची विक्री

नगर – दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसीतील एसएमएल महिंद्रा पाटील मोटर्समध्ये एकाच दिवशी तब्बल सहा ट्रकची विक्रमी विक्री झाली आहे. प्रतिसादामुळे महिंद्रा फ्युरिओच्या विश्वासार्हतेवर व्यावसायिक ग्राहकांनी पुन्हा एकदा पसंतीची मोहोर उमटवली आहे. महिंद्रा फ्युरिओ ट्रकचे उत्कृष्ट मायलेज, दमदार कामगिरी, आधुनिक तंत्रज्ञान आणि आरामदायी वातानुकूलित केबिन ही व्यावसायिकांसाठी विशेष आकर्षण ठरत असून कमी खर्चात अधिक कार्यक्षमता आणि व्यवसायाला नवी गती देणारी क्षमता यामुळे ग्राहकांची पसंती मिळत आहे. विशेष म्हणजे ट्रकच्या सेवेसाठी कंपनीकडून ४८ तासांची महामार्ग सेवा हमी योजना आणि ३६ तासांची कार्यशाळा दुरुस्ती हमी देण्यात येत आहे. दिवाळी पाडव्याला झालेल्या सहा ट्रकच्या या विक्रमी विक्रीने पाटील मोटर्सवरील ग्राहकांचा विश्वास पुन्हा एकदा अधोरेखित केला असून नवीन ट्रक खरेदी करून व्यवसायाच्या प्रगतीला नवी दिशा देण्याच्या याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पाटील मोटर्सच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी एसएमएल महिंद्रा – पाटील मोटर्स, भूखंड क्रमांक पी-१२५, रेणुका माता मंदिरासमोर, निंबळक रोड, एम आयडीसी, अहिल्यानगर येथे किंवा ७०२८८७१००९, ७९७२८६९००९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर अथवा ०२४१-२७७८९९६, ८९५६७४३१८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

मारहाण केल्याच्या गुन्ह्यातील आरोपीला न्यायालयाकडून जामीन

नगर – कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी किरकोळ कारणावरून भुतकरवाडी भिंगारदिवे मळा येथे घरात घुसून तलवार व काठीने मारहाण करून जखमी केल्याच्या कारणावरून आकाशभाई सुभाष गायकवाड रा.भिंगारदिवे मळा याच्याविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशन येथे शस्त्र अधिनियम व बीएनएस कलमाअंतर्गत गुन्हा दाखल झालेला होता.

गुन्ह्यातील फिर्यादी महिला घरी असताना आरोपीने दारावर लाथा मारून रात्रीच्या वेळी घरात घुसून फिर्यादीस दमबाजी केली व फिर्यादीची मुलं हे भांडणं सोडण्यासाठी मध्ये आले असताना आरोपीने फिर्यादीच्या मुलांना तलवारीने काठीने हातावर कमरेवर मारहाण करून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली असा कथनावरून आरोपीविरुद्ध वरील कलमान्वये गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाला होता. आरोपी याने सदर गुन्ह्यात अटकपूर्व जामीन भेटावा यासाठी ॲड. सचिन देवा पाठक यांच्यामार्फत जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने अटी शर्तीसह आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. आरोपीतर्फे न्यायालयात महत्त्वपूर्ण बाजू मांडून आरोपीस अटक पूर्व जामीन अर्ज मंजूर करून देण्यात ॲड. पाठक यांना यश आले.



गुलाटी मोटर्स या अशोक लेलँडच्या अधिकृत शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली.

गुलाटी मोटर्समध्ये अशोक लेलँडच्या विक्रीचा नवा उच्चांक

नगर – दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसी परिसरातील गुलाटी मोटर्स या अशोक लेलँडच्या अधिकृत शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली. आकर्षक योजना, विशेष सवलती आणि प्रत्येक नवीन गाडीच्या खरेदीवर एलईडी टीव्ही किंवा चार बर्नरची गॅस शेगडी अशी भेटवस्तू देण्यात आल्याने ग्राहकांनी वाहन खरेदीसाठी पसंती दर्शविली.

नवीन वाहन घरी आणण्याच्या उत्साहात अनेक ग्राहकांनी अशोक लेलँडच्या विविध व्यावसायिक वाहनांना पसंती दिली असून गुलाटी मोटर्सच्या वतीने प्रत्येक गाडीच्या खरेदीवर ग्राहकांना मिळालेल्या या खास भेटवस्तूमुळे त्यांच्या आनंदात आणखी भर पडली आहे. शोरूममध्ये दिवाळीनिमित्त आकर्षक सजावट करण्यात आली होती तसेच ग्राहकांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले. दिवसभर वाहनांची चौकशी, नोंदणी आणि नवीन वाहनांच्या वितरणासाठी ग्राहकांची लगबग सुरू होती. अशोक लेलँडची विश्वासार्हता, दमदार इंजिन क्षमता, उत्कृष्ट कामगिरी आणि व्यावसायिक वापरासाठी उपयुक्त वाहने यामुळे वाहतूक, मालवाहतूक आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांतील ग्राहकांचा या नाममुद्रेवरील विश्वास अधिक दृढ होत आहे.

दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांकडून मिळालेला प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक असून ग्राहकांचा विश्वास आणि प्रेम हीच आमची खरी ताकद आहे, तसेच त्यांना दर्जेदार वाहने, उत्तम सेवा आणि आकर्षक योजनांचा लाभ देण्यासाठी आम्ही नेहमीच कटिबद्ध आहोत, असे गुलाटी मोटर्सच्या प्रतिनिधींनी सांगितले.

घराचा पाया मजबूत तर घर मजबूत









मजबूत घराची सुरुवात योग्य पायापासूनच होते

घर बांधायला सुरुवात झाली की आपलं लक्ष लगेच कॉलम, बीम आणि स्लॅबकडे जातं. पण खरं पाहिलं तर घराची सुरक्षा सर्वात आधी पायापासून ठरते.

कारण वरचं संपूर्ण घर, त्याचं वजन आणि पुढची अनेक वर्षं हा पाया सांभाळणार असतो. म्हणून पाया खोदताना घाई, अंदाज किंवा इथे एवढं पुरेल असा निर्णय टाळणं खूप महत्त्वाचं आहे.

पाया आराखड्याप्रमाणेच असावा

साईटवर जागा पाहून फुटिंग थोडे इकडे-तिकडे करणे किंवा त्याची खोली बदलणे योग्य नाही. अशा बदलांचा परिणाम कॉलमच्या स्थानावर आणि संपूर्ण इमारतीच्या रचनेवर होऊ शकतो. फुटिंगची जागा, रुंदी, लांबी आणि खोली मंजूर संरचनात्मक आराखड्याप्रमाणे ठेवावी. खोदकाम सुरू करण्यापूर्वी मध्यरेषा आणि सर्व मोजमाप पुन्हा तपासावेत.

जमीन कशी आहे हे आधी समजून घ्या

सगळ्या प्लॉटची जमीन सारखी नसते. कुठेकाळी माती असते, कुठेभरावाची माती, कुठे मुरूम, तर कुठे पाणी लवकर लागतं. शेजाऱ्याच्या घराचा पाया पाहून आपल्या घराचा पाया ठरवून नये. आपल्या प्लॉटची भूस्थिती, आवश्यक माती परीक्षण आणि इमारतीवरील भार यांचा विचार करून अभियंत्याने पायाचे डिझाइन ठरवावे.

खोदकामानंतर तळ स्वच्छ आणि घट्ट असावा

पाया खोदल्यावर तळाशी सैल माती राहिली, कचरा पडला किंवा पाणी साचलं तर त्यावर थेट PCC करणं योग्य नाही. तळ स्वच्छ, समतल आणि योग्य वहनक्षमतेच्या जमिनीवर असावा. पाणी साचले असल्यास अभियंत्याच्या मार्गदर्शनाखाली ते काढावे. तळ नरम झाला असेल किंवा जास्त खोदला गेला असेल, तर सैल माती भरून पातळी जुळवून नये. दुरुस्तीची पद्धत अभियंत्याकडून निश्चित करूनच पुढचे काम करावे.

पाया खोदून जास्त दिवस उघडा ठेवून नका

खोदकामानंतर काम अनेक दिवस थांबले आणि पाऊस आला, तर तळाची माती नरम होऊ शकते. त्यामुळे तपासणीनंतर पुढचे काम वेळेत करावे. उघड्या खड्ड्यांभोवती अडथळे लावावेत आणि पावसाचे पाणी आत येऊ देऊ नये.

फुटिंगची मध्यरेषा चुकू देऊ नका

पाया खोदताना कॉलमची मध्यरेषा योग्य ठिकाणी असणे महत्त्वाचे आहे. एक फुटिंग चुकीच्या जागी गेले, तरी कॉलम, बीम आणि भिंतींची मांडणी बिघडू शकते.

शेजारच्या बांधकामाजवळ जास्त काळजी घ्या

शेजारी जुनी संरक्षक भिंत, घर किंवा दुसरे बांधकाम असेल, तर खोदकामापूर्वी अभियंत्याचे मार्गदर्शन घ्यावे. बाजूची माती घसरूनये म्हणून आवश्यक उतार किंवा आधारव्यवस्था ठरवावी. खोदलेली माती आणि जड यंत्रे खड्ड्याच्या कडेला ठेवू नयेत. शेजारच्या पाया खालची माती काढू नये.

जमीन कडक दिसली म्हणून खोली कमी करून नका

जमीन कडक दिसली तरी पायाची खोली स्वतःहून कमी करून नये. पायाचा आकार आणि खोली संरचनात्मक डिझाइन व जमिनीच्या क्षमतेनुसार ठरतात. बदल आवश्यक वाटल्यास संरचना अभियंत्याची मान्यता घ्यावी.

PCC करण्याआधी एकदा तपासणी करून घ्या

पाया खोदून झाल्यावर आणि साधे सिमेंट काँक्रीट (PCC) करण्यापूर्वी अभियंत्याकडून तळाची जमीन, खोली, पातळी आणि मोजमाप तपासून घ्यावीत. पुढील काम झाल्यावरही स्थिति प्रत्यक्ष पाहता येत नाही. त्यानंतर फुटिंगचे काँक्रीट करण्यापूर्वी स्वतंत्र तपासणी करावी. मध्यरेषा, सळ्यांचा व्यास व अंतर, अँकरिंग, काँक्रीट कव्हर, कव्हर ब्लॉक्स, कॉलमच्या सळ्या आणि शटरिंग आराखड्याप्रमाणे आहेत त्याबाबत खात्री करावी.

घरमालकाने एवढं लक्षात ठेवावं

पाया हा असा भाग आहे जो घर पूर्ण झाल्यानंतर दिसत नाही. टाइल्स बदलता येतात, रंग पुन्हा करता येतो आणि किचनही बदलता येतं. पण पायामध्ये चूक झाली तो नंतर दुरुस्त करणं कठीण आणि महाग असतं. मजबूत घर वरून सुंदर दिसतं, पण त्याची खरी ताकद जमिनीखाली असलेल्या योग्य पायामध्ये असते.



Er. Salim Masum Shaikh
B.E. Civil, M-Tech Structures (COEP)
Chartered Engineer, MISSE, MIE, MIV
My भूमी Consultants

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar



शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमनपदी प्रदीपकुमार जाधव यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. (छायाचित्र - लहू दळवी)

शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमनपदी प्रदीपकुमार जाधव यांची बिनविरोध निवड

नगर - अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमन पदाच्या निवडणुकीत संचालक प्रदीपकुमार जाधव यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेनंतर निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक बाळकृष्ण शिंदे यांनी त्यांच्या बिनविरोध निवडीची अधिकृत घोषणा केली.

संचालक प्रदीपकुमार जाधव यांच्या नावाची सूचना व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते यांनी मांडली, तर संचालक दत्तात्रय रासकोंडा यांनी अनुमोदन दिले. यावेळी बँकेचे चेअरमन सीए गिरीश घैसास, संचालक सुभाष गुंदेचा, संचालक विजयकुमार भंडारी, अशोक कानडे, संजय घुले, संचालिका रेश्मा आठरे, संचालक दत्तात्रय रासकोंडा, सेवक प्रतिनिधी संतोष मखरे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, उपनिबंधक कार्यालयातील महेश पालवे आदी उपस्थित होते.

बँकेचे चेअरमन सीए गिरीश घैसास म्हणाले की, अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाच्या निवडणुका बिनविरोध होण्याची परंपरा आहे. संचालक मंडळात एकमताने निर्णय घेऊन पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. यंदाही ही परंपरा कायम राहिली असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रदीप जाधव म्हणाले की, शहर सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने माझ्यावर विश्वास दाखवून व्हाईस चेअरमन पदावर काम करण्याची संधी दिली, याबद्दल मी सर्व संचालकांचे आभार मानतो. शहर सहकारी बँकेची उज्वल परंपरा असून, या परंपरेला साजेसे चांगले काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. बँकेच्या प्रगतीसाठी योगदान देत तिच्या नावलौकिकात भर घालण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जाधव यांचा चेअरमन सीए गिरीश घैसास, माजी व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते व संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

अ.ए.सोसायटी डी.एड. १९८९-९१ बॅचचा स्नेहमेळावा; तब्बल ३५ वर्षांनी आले एकत्र



माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याचे प्रास्ताविक करताना दादासाहेब घोलप.

निंबळक - अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील डी.एड. १९८९-९१ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा ३५ वर्षांनंतरचा स्नेहमेळावा उत्साहात झाला. साडेतीन दशकांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. सुरुवातीला एकमेकांना ओळखणे कठीण गेले, मात्र नाव सांगताच जुन्या आठवणी जाग्या झाल्या. ज्या वर्गात शिक्षण घेतले, त्याच वर्गात बसण्याचा आनंद सर्वांनी पुन्हा अनुभवला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक श्रीकृष्ण लांडगे होते. अहिल्यानगरचे शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुरगे आणि अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य संदीप उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन झाल्यानंतर 'ज्ञानदायी माऊली गो, हो सदा यशवंत तू...!' या प्रार्थनेचे सामुदायिक गायन करण्यात आले.

दादासाहेब घोलप यांनी प्रास्ताविक, तर रहिमान शेख यांनी स्वागत केले. आसिफ शेख व राजेंद्र बोंकड यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांतर्फे विद्यालयास पोर्टेबल स्पीकर संच भेट देण्यात आला. उपस्थितांनी आपला परिचय करून देत सेवाकाळातील आठवणी सांगितल्या. लवकरच पुन्हा स्नेहमेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. रमेश गोरे यांनी आभार मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी रहिमान शेख, राजेश साबळे, दादासाहेब घोलप, रमेश निमसे, रामदास सातपुते व नगरकर टीम यांनी परिश्रम घेतले.



भिंगारमध्ये म्हशींचा सगर उत्सव उत्साहात झाला.

भिंगारमध्ये म्हशींचा सगर उत्सव उत्साहात

भिंगार - दीपावली पाडव्यानिमित्त भिंगार येथील सातोबाचा कोपरा (नेहरू चौक) येथे गवळी समाजाची परंपरा संस्कृती आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडवणारा सगर उत्सव उत्साहात पार पडला. या उत्सवात लिंगायत गवळी समाज बांधव सहभागी झाले होते.

सागर उत्सव भरविण्याचा मान परंपरेने नायकु घराण्याकडे आहे. नंदू सदाशिव नायकु यांनी सगर भरवून उत्सवाला सुरुवात केली. प्रारंभी सगर देवतेची पूजा करण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक भीम लालबोंद्रे, शिवसेनेचे माजी नगरसेवक विष्णू घुले, नंदू लालबोंद्रे, अशोक नायकु, बाबुराव नायकु, दत्तात्रय हिरणवाळे, बाळू शहापूरकर, गंगाधर हाथरुणकर, शिवसेनेचे भिंगार शहर प्रमुख सुनील लालबोंद्रे, भिंगार बँक संचालक नामदेव लंगोटे, ठकाप्पा लंगोटे, किशोर नायकु, लिंगायत गवळी समाज पंचमंडळ तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

परंपरेने म्हशी पळवण्याचा पहिला मान राजू व संजय काटकर यांना आहे. त्यांनी सगर देवतेचे दर्शन घेतले. नंदू नायकु यांनी प्रथेप्रमाणे काटकर यांना पानविडा दिला. त्यांनी म्हशी पळविल्या. नंतर इतर समाजबांधवांच्या म्हशी पळवण्यात आल्या.

पाडव्याच्या दिवशी सकाळपासूनच भिंगारमध्ये गवळी समाज बांधवांनी म्हशींना धुवून सजवले शिंगांना रंगविले होते. म्हशींना ओवाळून सगर ठिकाणी आणण्यात आले. रुपेश लालबोंद्रे याने मुखशिट्टी वाजवून म्हशी पळवत रंगत आणली. राजगुरु याने हलगीच्या तालावर म्हैस पळविली. अनेकांनी दुचाकीवरून फिरत म्हशी पळविल्या. काहिंनी विशिष्ट आवाजात म्हशींना बोलवत पळविले. या सगरात अनेक लहान मोठे रेडे सहभागी झाले होते.

गणेश लालबोंद्रे, ओम काटकर, वेदांत काटकर, तानाप्पा धजाल, मयूर तोरडी, गणेश तोरडी, नितीन नायकु, खेमाजी धजाल, बंटी शहापूरकर, यश हाथरुणकर, शंकर नायकु, बाबा नामदे, हर्षल काटकर, अंबादास धजाल, रमेश धजाल तसेच बारसे बहिरट गोंधळे यांनी सगर उत्सवात म्हशी पळविल्या. यावेळी ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

भिंगारची ही परंपरा किमान २०० वर्षांपासून पिढ्यानपिढ्या चालत आली आहे. नायकु, काटकर या दोन घराण्यांचा मान आजही त्याच शिस्तीने आणि भक्तिभावाने जपला जात असल्याचे यावेळी समाजबांधवांनी सांगितले.



माजी नगरसेविका सौ. विजयाताई अजय दिघे यांच्या स्मरणार्थ येथील बालघर प्रकल्पातील बाळगोपाळांना किराणा वाटप करण्यात आले. याप्रसंगी अजय दिघे, विजय दिघे, आकाश दिघे, जय दिघे, विक्रम टाक, अजित वाडेकर, सचिन सुराणा, राजेंद्र बोरुडे आदी.

अहिल्यानगरमध्ये १७ नोव्हेंबरपासून राज्य नाट्यस्पर्धेचा प्रारंभ

नगर - सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या अहिल्यानगर केंद्रावरील प्राथमिक फेरीची तयारी जोरात सुरू झाली आहे. शहरातील सावेडी येथील माऊली सभागृहात १७ नोव्हेंबरपासून या स्पर्धेला प्रारंभ होणार असून, दररोज रात्री ८ वाजता नाट्यप्रयोग सादर केले जाणार आहेत. त्यामुळे दिवाळीनंतर नाट्यरसिकांना दर्जेदार नाट्यप्रयोगांची मेजवानी अनुभवता येणार आहे.

महाराष्ट्राला समृद्ध नाट्यपरंपरेचा वारसा लाभला आहे. या परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासोबतच हौशी कलाकारांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत दरवर्षी राज्य नाट्यस्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेतून नवोदित कलाकार, लेखक, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या नियोजनानुसार या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा अहिल्यानगर केंद्रावरील प्राथमिक फेरीत शहरासह जिल्ह्यातील विविध भागांतील एकूण २३ नाट्यसंस्था सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या तयारीसाठी सर्व नाट्यसंस्थांच्या तालमींना वेग आला असून, कलाकार आपापल्या दैनंदिन कामकाजातून वेळ काढून नाटकांच्या अंतिम तयारीत व्यस्त आहेत. संवादफेक, अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा आणि रंगमंचावरील हालचालींचा कसून सराव सुरू आहे.

यंदाच्या स्पर्धेत विविध विषयांवरील नाटके सादर होणार असल्याने नाट्यरसिकांना वेगवेगळ्या आशयांचे आणि नाट्यशैलींचे दर्शन घडणार आहे. सहभागी नाट्यसंस्थांमध्ये रंगणारी कलात्मक चुरस आणि कलाकारांच्या सर्जनशीलतेचा आविष्कार अनुभवण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. माऊली सभागृह, सावेडी येथे होणाऱ्या स्पर्धेतील नाट्यप्रयोगांना नाट्यरसिकांनी उपस्थित राहून हौशी कलाकारांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

मैत्रीचा सुगंध जपणारे, कर्तृत्वाने सन्मानित व्यक्तिमत्त्व

पांडुरंग डफळ यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस



काही माणसे आपल्या पदामुळे मोठी होतात, काही आपल्या कर्तृत्वामुळे ओळखली जातात; पण फार थोडी माणसे आपल्या स्वभावाने, प्रामाणिकपणाने, विनोदबुद्धीने आणि माणुसकीने अनेकांच्या हृदयात कायमचे स्थान निर्माण करतात. माझे स्नेही श्री. पांडुरंग डफळ हे अशाच गुणसंपन्न व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत.

९ नोव्हेंबर रोजी त्यांनी आपल्या आयुष्याची अमृत महोत्सवी ७५ वर्षे पूर्ण केली. या आनंदाच्या निमित्ताने आज त्यांनी पाटबंधारे खात्यातील आपले पूर्वीचे सहकारी, मित्र आणि स्नेही यांच्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. या निमित्ताने अनेक वर्षांपासूनचे मित्र एकत्र आले, जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि मैत्रीच्या ऋणानुबंधांचा एक सुंदर सोहळा अनुभवायला मिळाला.

पांडुरंग डफळ यांचे व्यक्तिमत्त्व केवळ मनमिळाऊ आणि विनोदी नाही, तर त्यांच्या प्रदीर्घ शासकीय सेवेत त्यांनी आपल्या कार्यक्षमतेचा आणि कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. पाटबंधारे खात्यातून प्रथम लिपिक म्हणून ते सेवानिवृत्त झालेले आहेत. शासकीय कामकाजातील कार्यकुशलता, कामाचा वेग, तत्परता, कर्तव्यनिष्ठा आणि प्रशासकीय कामातील गुणवत्ता या गुणांच्या जोरावर त्यांनी शासनाच्या कामात मोलाची भर घातली. त्यांच्या कार्यामुळे अनेक ठिकाणी शासनाचा फायदा झाला आणि शासकीय कामकाज अधिक प्रभावीपणे पार पडण्यास मदत झाली.

त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली. सन २००७ मध्ये त्यांना कार्यकुशलता, कामाची गतिमानता आणि तत्परता यांसाठी महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय गुणवंत कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात त्यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला. एखाद्या कर्मचाऱ्याच्या सेवाकाळातील हा सर्वोच्च आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असतो. त्यांच्या कर्तृत्वाला शासनाकडून मिळालेली ही अधिकृत मान्यता त्यांच्या संपूर्ण सेवाजीवनाचा गौरव करणारी आहे.

शासकीय सेवेत पदापेक्षा काम महत्त्वाचे असते आणि निवृत्तीनंतर पदापेक्षा माणसाने कमावलेला सन्मान महत्त्वाचा असतो. पांडुरंगरावांनी आपल्या सेवाकाळात कामाचा ठसा उमटविला आणि वैयक्तिक जीवनातही स्वच्छ चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि विश्वासार्हता जपली. त्यांच्या चारित्र्यावर अथवा वर्तनावर कोणताही डाग नसणे, ही त्यांच्या आयुष्यभराच्या मूल्यनिष्ठ आचरणाची खरी ओळख आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक विशेष पैलू म्हणजे त्यांचा मनमिळाऊ, विनोदी आणि मदतीस तत्पर असणारा स्वभाव. त्यांचा पांढराशुभ्र शर्ट-पँट हा नेहमीचा साधा, स्वच्छ आणि नीटनेटका पोशाख त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाला साजेसा आहे. ते कोणाशीही सहज संवाद साधतात, आपल्या विनोदबुद्धीने वातावरण आनंदी करतात आणि गरज पडल्यास इतरांच्या मदतीला धावून जातात. माणसे जोडणे आणि ती जोडलेली नाती आयुष्यभर जपणे ही त्यांची मोठी खासियत आहे.

निवृत्तीनंतरही त्यांनी स्वतःला केवळ विश्रांतीपुरते मर्यादित ठेवले नाही. कथा, कविता, साहित्य आणि व्याख्यान यांची त्यांना विशेष आवड आहे. हास्य क्लबमध्ये ते आपल्या विनोदी स्वभावाने आनंद निर्माण करतात, तर साहित्य संमेलनांमध्ये आपल्या स्वरचित कविता सादर करून रसिकांची दाद मिळवतात. स्वतःच्या कविता गाणे, विचार व्यक्त करणे आणि साहित्यिक उपक्रमांत सक्रिय राहणे यातून त्यांच्यातील सर्जनशीलता आणि उत्साह दिसून येतो. वयाची पंचाहत्तरी पूर्ण करूनही त्यांच्यातील हा उत्साह खरोखरच प्रेरणादायी आहे.

आजच्या या स्नेहमेळाव्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध संस्था आणि मित्रपरिवाराने मोठ्या आपुलकीने लावलेली उपस्थिती. किल्ला मैदान हास्य क्लब, मार्कंडेय मॉर्निंग ग्रुप, स्वकूळ साळी मित्र मंडळ सिद्धीबाग, बुधवार संध्याकाळ ज्येष्ठ नागरिक संघ आणि जिजाऊ फाउंडेशन, मोहोज बुद्रुक अशा विविध समूहांचे प्रतिनिधी आणि सदस्य या आनंदसोहळ्यात सहभागी झाले होते.

या उपस्थित मित्रपरिवारातील वयाचा आवाका विशेष उल्लेखनीय होता. सुमारे ६५ वर्षांपासून ते ९२ वर्षांपर्यंतच्या ज्येष्ठ मित्रांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून पांडुरंगरावांवरील आपले प्रेम व्यक्त केले. वयाची वेगवेगळी टप्पे पार केलेली ही माणसे एकत्र येऊन आनंदाने गप्पा मारतात, एकमेकांच्या सुखदुःखांची विचारपूस करतात आणि मैत्रीचा आनंद घेतात, हे दृश्य मनाला समाधान देणारे होते.

या सर्व ज्येष्ठ मित्रांनी आपापल्या सेवाकाळात कुटुंबाची जबाबदारी सांभाळली, शासकीय व सामाजिक कर्तव्ये पार पाडली आणि समाजाच्या जडणघडणीत आपापल्या परीने योगदान दिले. आज निवृत्तीनंतरही त्यांनी आपले सामाजिक संबंध, मैत्री आणि परस्परांबद्दलची आस्था जिवंत ठेवली आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील अनुभवाच्या रेषांबरोबरच जुन्या मैत्रीचा आनंद आणि एकमेकांना भेटल्याचे समाधान स्पष्टपणे जाणवत होते.

खरे तर माणसाने आयुष्यात किती पैसा कमावला, किती मोठे पद मिळवले किंवा किती संपत्ती जमा केली, यापेक्षा आयुष्याच्या उत्तरार्धात किती माणसे प्रेमाने त्याच्या भोवती उभी राहतात, हे अधिक महत्त्वाचे असते. पांडुरंग डफळ यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त जमलेला हा मित्रपरिवार म्हणजे त्यांनी आयुष्यभर कमावलेल्या खऱ्या संपत्तीचे प्रतीक आहे. ही संपत्ती कोणत्याही बँकेत जमा करता येत नाही किंवा बाजारात विकत घेता येत नाही. ती मिळवावी लागते ती प्रामाणिकपणाने, प्रेमाने, विश्वासाने, सहकार्याने आणि माणुसकीने!

पांडुरंगराव, आपल्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आपणास मनःपूर्वक शुभेच्छा! आपल्या शासकीय सेवाकाळातील उल्लेखनीय कर्तृत्वाचा आम्हाला अभिमान आहे आणि आपल्या मैत्रीपूर्ण, विनोदी व मदतशील स्वभावाचा आम्हाला आनंद आहे. आपले उर्वरित आयुष्य उत्तम आरोग्य, आनंद, समाधान, साहित्यिक अभिव्यक्ती आणि मित्रपरिवाराच्या सहवासात व्यतीत होवो. आपल्या उत्साहाचा आणि सर्जनशीलतेचा झरा असाच अखंड वाहत राहो.

आपण शतायुषी व्हावे आणि आपल्या पुढील वाढदिवसांनाही असाच मित्रपरिवार आनंदाने एकत्र यावा, ही मनःपूर्वक सदिच्छा!


आपल्या कर्तृत्वाला सलाम, आपल्या स्वच्छ चारित्र्याला मानाचा मुजरा आणि आपल्या मैत्रीला मनापासून शुभेच्छा!

- तुकाराम यशवंतराव मचे,
अध्यक्ष, जिजाऊ फाउंडेशन, सेवानिवृत्त उप अभियंता, जलसंपदा विभाग

निरामय

शरीरातील छोटे-छोटे बदल किडनीशी संबंधित

किडनी म्हणजे आपल्या शरीरातील अतिशय महत्त्वाचा अवयव मानला जातो. शरीर निरोगी ठेवण्यासाठी किडनी अनेक महत्त्वाची कामं करते. रक्तातील घाण आणि शरीरासाठी हानिकारक पदार्थ बाहेर काढण्याचं काम किडनी करते. याशिवाय शरीरातील पाणी आणि इतर द्रवपदार्थांचं संतुलन योग्य ठेवण्याची जबाबदारीही किडनीवर असते; मात्र किडनीशी संबंधित आजारांची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्यांची लक्षणं सुरुवातीला सहज लक्षात येत नाहीत. अनेक वेळा किडनीचा आजार वाढल्यानंतरच त्याची लक्षणं स्पष्टपणे जाणवू लागतात. त्यामुळे शरीरात होणारे छोटे-छोटे बदलही दुर्लक्षित न करणं महत्त्वाचं आहे.



जाणून घ्या

लघवी करण्याच्या सवयीत अचानक बदल झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष करणं तुम्हाला महागात पडू शकतं. नेहमीपेक्षा जास्त वेळा लघवीला लागणं रात्री वारंवार लघवी करण्यासाठी उठावं लागणं, या संकेताकडे गंभीरतेने पाहा. लघवीच्या रंगात झालेला बदलही महत्त्वाचा संकेत मानला जातो. लघवी अचानक गडद रंगाची दिसत असेल किंवा त्यामध्ये फेस दिसत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्याचप्रमाणे लघवी करताना जळजळ होणे, हा देखील शरीराकडून मिळणारा एक संकेत असू शकतो. किडनी ही रक्तातील घाण आणि अतिरिक्त पदार्थ योग्य प्रकारे गाळू शकत नसेल, तर शरीरात अतिरिक्त पाणी आणि सोडियम साचू लागतो. यामुळे शरीराच्या काही भागांमध्ये सूज येऊ शकते. पाय, घोटे, हात आणि चेहऱ्यावर विनाकारण सूज दिसणं हे लक्ष देण्यासारखं लक्षण आहे. याआधी अशी समस्या नसताना अचानक शरीराच्या या भागांना सूज येत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.

किडनीशी संबंधित अनेक आजार सुरुवातीला कोणतीही लक्षणं न दाखवता वाढत असतात. त्यामुळे लघवीतील बदल किंवा शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर दिसणारी सूज यांसारख्या संकेतांकडे वेळीच लक्ष देणं महत्त्वाचं आहे. अशी लक्षणं जाणवत असतील किंवा ती वारंवार होत असतील, तर योग्य तपासणीसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

...तर दृष्टीवर परिणाम!

वय वाढत असताना डोळ्यांच्या आरोग्याशी संबंधित अनेक समस्या जाणवू लागतात. त्यापैकी मोतीबिंदू ही एक सामान्य समस्या आहे; मात्र सुरुवातीला याची लक्षणं सौम्य असल्याने अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. हळूहळू दृष्टी धूसर होऊ लागते आणि रोजच्या कामांवरही त्याचा परिणाम जाणवू लागतो. डोळ्याच्या बाहुलीच्या मागे एक नैसर्गिक पारदर्शक लेन्स असतो. या लेन्सचं काम प्रकाशकिरणांना रेटिनावर योग्य प्रकारे केंद्रित करणं, जेणेकरून आपल्याला स्पष्ट दिसू शकेल; मात्र या लेन्समध्ये हळूहळू धुरकटपणा निर्माण झाला की, त्याला 'मोतीबिंदू' म्हणतात.



मोतीबिंदू सहसा अचानक होत नाही. तो हळूहळू वाढतो आणि सुरुवातीला वेदनाही होत नाहीत. त्यामुळे अनेकांना बराच काळ समस्या लक्षात येत नाही. मोतीबिंदू झाल्यास अशी लक्षणं जाणवू शकतात

दुर्लक्ष नको

* वस्तू धूसर किंवा धुक्यातून पाहिल्यासारख्या दिसणे
* रात्रीच्या वेळी स्पष्ट दिसण्यात अडचण येणे
* वाहन चालवताना हेडलाइट किंवा तेजस्वी प्रकाशाचा जास्त त्रास होणे
* डोळ्यांसमोर धुकट काच असल्यासारखं वाटणे
* दृष्टी हळूहळू कमी होणे
* चष्म्याचा नंबर वारंवार बदलण्याची गरज भासणे.

मोतीबिंदू होण्याचं मुख्य कारण

वाढतं वय हे मोतीबिंदूचं सर्वात सामान्य कारण आहे. वयानुसार डोळ्यातील नैसर्गिक लेन्समधील प्रथिनांमध्ये बदल होतात. त्यामुळे लेन्सची पारदर्शकता कमी होऊन तो धुरकट होऊ लागतो. याशिवाय काही घटकांमुळेही मोतीबिंदूचा धोका वाढू शकतो. यामध्ये दीर्घकाळ सूर्यप्रकाशातील यूव्ही किरणांचा संपर्क, मधुमेह, धूम्रपान, दीर्घकाळ स्टेरॉइड्सचा वापर आणि डोळ्याला झालेली दुखापत यांचा समावेश होतो.

मेंदूची माहिती मिळणार एका चिपवर

आपण आतापर्यंत शरीरातील रक्ताची चाचणी करत होतो. त्यानुसार पुढील उपचार करता येत होते; पण आता या मर्यादेपलीकडे जाऊन या या चाचणीच्या पलीकडे जाऊन मेंदूमधील रक्ताचे परीक्षण करता येणार आहे. तुमचा मेंदू कसे काम करतोय? मेंदू भागात किती रक्त आहे. कोणता त्रास आहे? याची संपूर्ण माहिती एका चिपच्या आधारे आता कळणार आहे.

हे चिपचे मुख्य काम मेंदूतील रक्ताची पातळी मोजणे हा आहे. हे उपकरण ८४ टक्के ९१ टक्क्यांपर्यंत थेट मेंदूतील रक्तप्रवाह अचूकपणे मोजते. आतापर्यंत लॅबमध्ये ६० लोकांवर याची यशस्वीपणे चाचणी केली आहे आणि ती चाचणी यशस्वी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या टेंपल डिव्हाइसची ६० लोकांवर लॅबमध्ये यशस्वीपणे चाचणी करण्यात आली. या चाचणी दरम्यान डोक्याच्या वरच्या त्वचेऐवजी थेट मेंदूच्या आतील रक्तप्रवाह (सेलेब्रल ब्लड फ्लो) ८४ टक्के ते ९१ टक्के अचूकतेने ट्रॅक करत असल्याचे समोर आले आहे. दीर्घ आणि निरोगी आयुष्य जगायचे असेल तर हे संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे.



अंतर्गत विकार लवकर कळून येत नाही, त्यामुळे आजार बळवतो. ब्रेन हॅमरेज, ब्रेन ट्युमर यांसारखे अनेक आजारांना तोंड द्यावे लागते आणि त्यावेळी परिस्थिती हाताबाहेर गेलेली असते; पण या डिव्हाईसमुळे मेंदूचे रिअल टाइम काम समजून घेण्यास मदत होणार आहे. टेंपल हे क्लिनीकल चाचणीपुरता मर्यादित न राहणार नाही आहे. सर्वसामान्य लोकांनाही याचा लवकरच वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे २४ तास मेंदूवर नजर राहणार आहे.

नवप्रयोग

टेंपल हे मनगटावर न बांधता डोक्याच्या साइडच्या भागला लावले जाणारे एक छोटे डिव्हाईस चीप आहे. मिळालेल्या माहितीनुसार हे भारताच्या 'प्रीमियर हेल्थ-टेक मार्केट'मध्ये याची किंमत सुमारे ७२ हजार ते ऐंशी हजार रुपये असण्याची शक्यता आहे. सध्या हे उपकरणव्दारे आणखी काही लोकांची टेस्टिंग केली जात असल्याने लवकरच ते भारतात सर्वसामान्यांसाठी लाँच केले जाणार आहे.

गुडघेदुखीचा हृदयावर परिणाम

सतत गुडघेदुखी किंवा सांधेदुखी असल्यामुळे अनेक लोक चालणे, व्यायाम करणे किंवा इतर शारीरिक हालचाली करणे टाळतात. त्यामुळे हळूहळू त्यांची शारीरिक हालचाल कमी होऊ लागते. अशा प्रकारे वेदना आणि कमी हालचाल यांचे एक चक्र तयार होऊ शकते. याचा परिणाम केवळ गुडघ्यांवरच नाही, तर एकूण आरोग्यावर आणि हृदयाच्या आरोग्यावरही होऊ



काळजी घ्या

शकतो.


गुडघेदुखी ही मुख्यतः हाडे, सांधे आणि स्नायूंशी संबंधित समस्या आहे; मात्र त्याचा परिणाम शरीराच्या इतर भागांवरही होऊ शकतो. गुडघेदुखीमुळे चालणे, जिने चढणे किंवा व्यायाम करणे त्रासदायक झाले, तर व्यक्ती हळूहळू कमी हालचाल करू लागते. काही काळानंतर शारीरिक हालचाल कमी झाल्यामुळे वजन वाढू शकते, स्नायूंची ताकद कमी होऊ शकते आणि शरीराची तंदुरुस्ती कमी होऊ शकते. यासोबतच हृदयाच्या आरोग्याशी संबंधित काही जोखीमही वाढू शकतात. गुडघेदुखीमुळे एखादी व्यक्ती दीर्घकाळ व्यायाम किंवा शारीरिक हालचाल करत नसेल, तर त्याचा परिणाम हृदयाच्या आरोग्यावर होऊ शकतो.

एकाकीपणा अधिक धोकादायक

अनेकांना एकटे राहणे आवडते, पण काहींना ही बाब त्रासदायक वाटू शकते. एकटे राहणारे अनेकजण मानसिकरित्या त्रस्त दिसतात. सध्या लोकांमध्ये एकटेपणा वाढत असल्याचे चित्र दिसते. अर्थातच त्याची अनेक वैयक्तिक कारणे असू शकतात; परंतु एकटेपणा ही केवळ मनारोग्यास कारक ठरणारी समस्या नसून ती वाढली तर गंभीर आरोग्य धोक्याची बाबही बनते. दिवसाला १५ सिगारेट ओढण्याच्या घातक परिणामांइतकी ही समस्या गंभीर ठरु शकते. म्हणूनच अनेक आरोग्य तज्ज्ञांनी वाढत्या एकाकीपणाबद्दलच्या जागतिक प्रश्नाबाबत चिंता व्यक्त केली आहे. कोविड-१९ साथीनंतर परिस्थिती बदलली असून लोकांमध्ये एकटेपणाची पातळी वाढली आहे. आज बरेच लोक चिंता आणि नैराश्याने ग्रस्त आहेत. परंतु ते उपाय शोधण्यात कचरत आहेत. 'सोशल मीडिया'वरील वाढते अवलंबित्व हे या समस्येमागील एक प्रमुख कारण आहे. एकाकीपणामुळे वृद्धांमध्ये डिमेंशियाचा धोका ५० टक्क्यांनी तर हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका ३० टक्क्यांनी वाढत असल्याचे समोर आले आहे.

एकटेपणा म्हणजे काय?

एकटेपणा ही एक मानवी भावना असून ती प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळ्या प्रकारे जाणवते. फक्त एकटे राहणे ही बाब यात अंतर्भूत नसून लोकांमध्ये असूनही एखाद्याला एकटेपणा आणि अलिप्तता जाणवते तेव्हा यालाही एकटेपणा म्हटले जाते. उदा. कॉलेजमध्ये एखाद्या विद्यार्थ्याला सर्वांबरोबर असूनही एकटेपणा जाणवू शकतो. परभागात तैनात असताना एखादा सैनिक सहकाऱ्यांच्या उपस्थितीतही एकटेपणा अनुभवतो. मानसिक तज्ज्ञांच्या मते, ही बाब खूप गंभीर आहे.



आरोग्य चर्चा

एकटेपणामुळे होणारे परिणाम

एकटेपणाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतात. त्यात दारू आणि ड्रग्जचे व्यसन, सदोष कार्यप्रणाली, अल्झायमरसारखा आजार, असामाजिक वर्तन, हृदयरोग, स्मरणशक्ती कमी होणे, शिकण्याची क्षमता कमी होणे, नैराश्य, आत्महत्येचे विचार, तणाव पातळीत होणारी वाढ, चुकीचे निर्णय घेणे अशा अनेक धोक्यांचा समावेश होऊ शकतो.

उपाय

* आवडत्या कामांमध्ये सहभागी व्हा. * नवीन मैत्री करा. * नकारात्मक विचार टाळा. * सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. * समान विचारसरणी आणि मूल्ये असणाऱ्या लोकांशी संबंध प्रस्थापित करा. * एकाकीपणाचे परिणाम समजून घ्या. * मित्र आणि कुटुंबाच्या संपर्कात राहा. * त्रास वाढल्यास विश्वासू व्यक्ती, डॉक्टर किंवा थेरपिस्टशी संवाद साधा.


अँटिबायोटिक्सचे डोस पूर्ण करा

बऱ्याचदा संसर्ग किंवा ॲलर्जिक आजारांबाबतीत डॉक्टर अँटीबायोटिकचा कोर्स घेण्याचा सल्ला देतात. ही औषधे कोणत्याही जीवाणू संसर्गाविरुद्ध जलद आणि प्रभावी परिणाम देतात. परंतु इतर औषधांप्रमाणे, योग्यरित्या न वापरल्यास अँटीबायोटिक्सचे काही दुष्परिणाम होऊ शकतात. म्हणूनच यासंबंधी माहिती असायला हवी. बरेचदा औषध घेतल्यानंतर एक-दोन दिवसांनी लोक मनानेच औषध घेणे थांबवतात. पण ही सर्वात मोठी चूक ठरते. डॉक्टर नेहमीच कोर्स पूर्ण करण्याचा सल्ला देतात. अर्थातच यामागे महत्त्वाचे कारणे आहेत.

इथे आपण लक्षात घ्यायला हवे की, अँटीबायोटिक्स विशिष्ट प्रमाणात आणि विशिष्ट कालावधीसाठी दिली जातात. त्यामुळे संसर्गजन्य जीवाणू पूर्णपणे नष्ट होतात. असे असताना उपचार अर्धवट सोडले तर काही जीवाणू टिकून राहतात आणि पुन्हा उपद्रव निर्माण करतात. परिणामी संसर्ग पुन्हा वाढू शकतो तसेच अधिक गंभीर होऊ शकतात.

अँटीबायोटिक प्रतिकार म्हणजे काय?

अँटीबायोटिक प्रतिकार म्हणजे बॅक्टेरियाच्या प्रभावांना प्रतिकार करण्याची



आरोग्यभान

क्षमता मिळवणे. कोर्स अर्धवट सोडल्यास औषधांमधील प्रतिकारक्षमता प्रभावित होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, २०१९ मध्ये प्रतिजैविक प्रतिकारामुळे १०.२७ लाख लोकांचा मृत्यू झाला तर ४०.९५ लाख मृत्यूंमध्ये त्याचा अप्रत्यक्षपणे सहभाग होता. ही आकडेवारी गांभीर्य दाखवून देणारी आहे.

औषधांचा कोर्स मध्येच बंद केल्यास...

अँटीबायोटिक औषधांचा कोर्स मध्येच बंद केल्याने बॅक्टेरिया जिवंत राहतात आणि औषधांना प्रतिकार करण्याची त्यांची क्षमता वाढते. यामुळे संसर्ग कमी होत नाही तर दुसरीकडे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते. परिणामी, भविष्यात पुन्हा संसर्ग किंवा संसर्गजन्य रोग बरे करणे कठीण होऊ शकते. आजार पूर्वीपेक्षा अधिक गुंतागुंतीचे होतो. अपूर्ण उपचारांमुळे जीवाणू प्रतिरोधक बनतात आणि सामान्य संसर्गांसाठी नियमित औषधेही प्रभावहीन होतात.

हे आहेत दुष्परिणाम...

थोडक्यात औषधांचा अयोग्य किंवा अपुरा वापर अनेक समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. जसे की यामुळे त्वचेशी संबंधित आजार, मळमळ, पोट खराब होणे यासारखा त्रास होऊ शकतो.

तज्ज्ञ काय म्हणतात?

अँटीबायोटिक्स नेहमीच डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली निर्धारित डोस आणि कालावधीत घ्यायला हवी. वेगवेगळ्या संसर्गासाठी वेगवेगळी औषधे आणि डोस आवश्यक असतात. म्हणून अतिरिक्त औषधे घेणे किंवा मनाने औषधे वापरणे टाळा. अनावश्यक औषधे किंवा अल्कोहोलही टाळा. उपचारादरम्यान कोणतीही अनपेक्षित प्रतिक्रिया झाल्यास स्वतःहून औषध बंद करण्याऐवजी ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

संसर्गजन्य घटकांमुळेही कॅन्सर

व्यक्तीला असा संसर्ग झाला म्हणजे तिला कॅन्सर होणारच, असा याचा अर्थ अजिबात नाही. हा अभ्यास व्यक्तिगत धोका सांगत नाही, तर संपूर्ण लोकसंख्येतील कॅन्सरच्या प्रमाणाचा अंदाज देतो. अभ्यासात काही संसर्गांमुळे झालेल्या कॅन्सरचे प्रमाण मोठे असल्याचे दिसले.

कॅन्सर म्हटलं की, तंबाखू, सिगारेट, दारू, प्रदूषण, लठ्ठपणा किंवा आनुवंशिकता हे घटक सर्वप्रथम लक्षात येतात; मात्र काही संसर्गजन्य आजारांचाही कॅन्सरशी संबंध असू शकतो, असं नव्या जागतिक विश्लेषणातून समोर आलं आहे. 'इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर'च्या (आयएआरसी) संशोधकांनी केलेल्या अभ्यासानुसार, २०२४ मध्ये जगभरातील सुमारे २३ लाख नवीन कॅन्सरच्या रुग्णांमागे संसर्गजन्य घटक कारणीभूत होते. हे प्रमाण सर्व नवीन कॅन्सरच्या सुमारे १२ टक्के आहे. हा अभ्यास 'द लॅन्सेट ऑकॉलॉजी'मध्ये प्रकाशित झाला आहे.




आरोग्य जागृती

काही विषाणू, बॅक्टेरिया आणि परजीवी शरीरात दीर्घकाळ राहिल्यास सततचा संसर्ग, दीर्घकाळची सूज किंवा पेशींमध्ये होणारे बदल यांमुळे कॅन्सरची प्रक्रिया सुरू होण्यास हातभार लागू शकतो. 'आयएआरसी' ने कॅन्सरशी संबंधित असलेल्या वर्गीकृत केलेल्या १२ संसर्गजन्य घटकांचा या विश्लेषणात समावेश केला आहे; मात्र एखाद्या

* **हेलिकोबॅक्टर पायलोरी (एच. पायलोरी)** – सुमारे ७.६ लाख कॅन्सर प्रकरणांशी संबंधित. प्रामुख्याने पोटाचा कॅन्सर.
* **ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही)** – सुमारे ७.५ लाख प्रकरणांशी संबंधित. विशेषतः गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर.
* **हिपेटायटिस-बी व्हायरस (एचबीव्ही)** – सुमारे ३.६ लाख प्रकरणे.
* **एपस्टिन बार व्हायरस (ईबीव्ही)** – सुमारे २.६ लाख प्रकरणे.
* **हिपेटायटिस-सी व्हायरस (एचसीव्ही)** – सुमारे १.६ लाख प्रकरणे.

नवसंशोधन

...म्हणून लोक पत्करतात धोका!



काही लोक धोके पत्करतात. धाडसी खेळ खेळतात. दुसरीकडे काहींना उंचावर जाण्याचीही खूप भीती वाटते. मेंदूतल्या विशिष्ट प्रकारच्या पेशींमुळे असं होतं ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. ओएलएम नावाच्या या पेशी धोका पत्करण्याच्या मानसिकतेत महत्त्वाची भूमिका बजावतात. हा शोध अस्वस्थता, चिंता, काळजी, नैराश्य यांसारख्या मानसिक विकारांवरील उपचारांसाठी मैलाचा दगड ठरेल, अशी अपेक्षा आहे.

दंतारोग्य

डोळ्यांना दुखापत झाल्यास....



डोळा हा आपल्या शरीराचा अत्यंत नाजूक असा अवयव आहे. त्यामुळे डोळ्याला होणारी कोणतीही दुखापत किंवा संसर्ग गंभीर स्वरूपाचा असू शकतो. डोळ्याला दुखापत झाली की तातडीने औषधोपचार व्हायला हवेत. यामुळे संभाव्य नुकसान टळू शकतं. डोळा दुखणं, सतत पाणी येणं, डोळे लाल होणं, पापण्या सुजणं ही डोळ्यांच्या दुखापतीची लक्षणं आहेत. त्यामुळे डोळ्यांना दुखापत झाली की तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.

डोळ्यांचे आरोग्य

कारणं श्वासाच्या दुर्गंधीची



वैद्यकीय भाषेत श्वासाच्या दुर्गंधीला 'हॅलीटोसिस' असं म्हटलं जातं. तोंडाची आणि दातांची अस्वच्छता हे तोंडाच्या दुर्गंधीचं महत्त्वाचं कारण आहे. दातांमध्ये अडकलेल्या अन्नकणांवर बॅक्टेरिया वाढतात. या बॅक्टेरियांमुळे तोंडाला दुर्गंधी येते. तोंड कोरडं पडणं हे सुद्धा तोंडाच्या दुर्गंधीचं कारण आहे. हिरड्यांशी संबंधित विकारांमुळेही तोंडाला दुर्गंधी येते. त्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीचं कारण जाणून घेऊन त्यावर योग्य ते उपचार करायला हवेत.

आजीबाईचा बटवा

प्रथिनयुक्त पालक



आहारात प्रथिनांचा समावेश करायला हवा. अंडी, मांस आणि मासे हे प्रथिनांचे उत्तम स्रोत आहेत. शाकाहारींसाठीही प्रथिनं मिळवण्याचे बरेच पर्याय आहेत. त्यापैकी एक म्हणजे पालक. पालकामध्ये भरपूर प्रमाणात प्रथिनं असतात. यासोबतच त्यात भरपूर लोह, जीवनसत्त्व, खनिजं आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे आहारात पालकाचा समावेश करायला हवा.

कुंदनऋषीजी महाराज यांचा ९३ वा जन्मोत्सव उत्साहात

सौरभ बोरा 'समाज रत्न' तर अशोक (बाबूशेठ) बोरा 'समाज गौरव' पुरस्काराने सन्मानित



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन कर्मभूमी आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे समर्पण चातुर्मास उत्साहात पार पडत आहे. शनिवारी सकाळी याठिकाणी आचार्यश्रीजींचे ज्येष्ठ शिष्य महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांचा ९३ वा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., साध्वीजी त्रिशलाकंवरजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा., अनंतज्योतीजी म.सा., विनितदर्शनाजी म.सा. यांच्या पावन सानिध्यात झालेल्या या कार्यक्रमात अपूर्वज्योतीजी म.सा. यांच्या १०८ आयंबिल तपोत्सवाची पूर्णाहुती झाली.

प्रवर्तकश्रीजींच्या घोषणेनुसार उद्योगपती सौरभ हेमराज बोरा यांचा 'समाज रत्न' म्हणून सन्मान करण्यात आला. तसेच अशोक (बाबूशेठ) बोरा यांचा 'समाज गौरव' म्हणून सन्मान करण्यात आला. प्रारंभी प्रमिलाताई बोरा यांचाही सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, हभप संग्राम भंडारे, सौ. राखी बोरा, समर्पण चातुर्मास कमिटीचे महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, संजय मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, शालीभद्र चपलोत (इंदौर), डॉ.सक्करबाई मेहेर, रमणलाल लुंकड, अशोक पगारिया, बाळासाहेब धोका (पुणे), इंदरचंद शिंगवी, नितीन कोटेचा, अतुल बोरा (मुंबई), जैन मंदिर अध्यक्ष सुभाष मुथा, मोहनलाल मानधना, ईश्वर बोरा, मर्चंटस बँकेचे चेअरमन संजय चोपडा, माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, सौरभ मित्र मंडळाचे सदस्य, नगरमधील विविध जैन संघांचे पदाधिकारी, नगरसह इंदौर, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बंगलोर, मुंबईसह देशभरातून आलेले भाविक उपस्थित होते.

रितू ताथेड आणि रैना ताथेड या भगिनी पिंपरी चिंचवड ते अहिल्यानगर अहिंसा सायकल यात्रा काढून आल्या. त्यांचेही सर्वांनी अभिनंदन केले.

कुंदनऋषीजी महाराज म्हणाले की, यावर्षी उपाध्यायश्रीजींचा चातुर्मास हा ऐतिहासिक ठरला आहे. अतिशय सुंदर कार्यक्रम पाहून आनंद झाला. समाजात धार्मिकता वाढली आहे. महासतीजी अपूर्वज्योतीजी यांच्या आयंबिल व्रतानेही आदर्श निर्माण केला आहे. तिर्थेशऋषीजी महाराज यांची साधनाही खूप आनंददायी आहे. सौरभ व बाबूशेठ बोरा यांची समर्पण भावनाही चातुर्मासात सर्वांना दिसली. भविष्यातही असेच भव्यदिव्य धर्म कार्य व्हावेत. माझा जन्मदिनी आपल्या सर्वांच्या शुभेच्छा मिळाल्या यासाठी मी आभारी आहे.

प्रविणऋषीजी म.सा. म्हणाले, नगरकर भाग्यवान आहेत कारण येथे प्रवर्तकश्रीजी विराजमान आहेत. त्यांना आपल्या गुरूदेवांच्या भूमीतच राहायचे आहे. प्रवर्तकश्रीजींनी मला अपार वात्सल्य, प्रेम दिले आहे. त्यांचा माझ्यावर अतूट विश्वास आहे. मी महाराष्ट्रात कधीही न येण्याचा निश्चय होता. पण प्रवर्तकश्रीजींच्या आग्रहामुळे मी आलो. त्यांच्यावर माझी आस्था आहे. ते माझे उपकारी आहेत. नगरला गुरूदेवांच्या भूमीत चातुर्मासात त्यांचे मोठे सान्निध्य लाभले आहे. ते कायम स्वस्थ राहून त्यांचे मार्गदर्शन मिळत राहो हीच मंगल भावना. आयंबिल तप हे खूप कठीण असते. वयाच्या ७२ व्या वर्षी हे तप करणाऱ्या अपूर्वज्योतीजी म.सा. यांना 'तपोमूर्ती' उपाधीने अलंकृत करण्यात येत आहे. याशिवाय आज याठिकाणी सौरभ व बाबूशेठ बोरा यांना अलंकृत करताना आनंद होत आहे.

संग्रामबापू भंडारे म्हणाले, पूर्व जन्मीचे पुण्य असेल म्हणून मला आज कुंदनऋषीजी महाराज, प्रविणऋषीजी महाराज यांच्या दर्शनाचा योग आला. साधूसंत हे माणसाला देव बनवण्याचे काम करतात. भारताची आज जी काही प्रगती झाली आहे, ती आपल्या साधूसंतांमुळेच झालेली आहे. हा चातुर्मास खऱ्या अर्थाने भाविकांसाठी पर्वणी आहे.

तिर्थेशऋषीजी म.सा. यांनी प्रवर्तकश्रीजींचरणी सुमधुर गीत सादर केले.

आलोकऋषीजी म.सा.म्हणाले, प्रवर्तकश्रीजींनी मला दीक्षा दिली हे माझे भाग्य आहे. त्यांनी मला भरभरून ज्ञान दिले. त्यांच्या सान्निध्यात राहण्याची संधी मला मिळाली आहे. त्यांच्यातील सहजता, साधेपणा अलौकिक आहे. ते आचार्यश्रीजींची प्रतिमूर्ती आहेत.

अनिल पोखरणा यांनी स्वागत करताना सांगितले की, आजचा दिवस चार चौकारांचा दिवस आहे. अपूर्वज्योतीजी म.सा.यांनी सर्वात कठीण असे आयंबिल तप केले आहे. आज गुरूदेवांची प्रतिकृती असलेल्या प्रवर्तकश्रीजींचा जन्मोत्सव आहे. त्यांना निरोगी आयुष्य लाभो अशा भावना व्यक्त करतो. आज सौरभ व बाबूशेठ बोरा यांचा सन्मान करण्याचेही भाग्य चातुर्मास कमिटीला लाभले आहे. सौरभ बोरा हे खऱ्या अर्थाने नगरचे भामाशाह आहेत. बाबूशेठ बोरा यांनी उपाध्यायश्रीजींचा ऐतिहासिक चातुर्मास नगरला अक्षरशः खेचून आणण्याचे काम केले आहे. त्यांनी ट्रस्टींना सोबत घेत चातुर्मासाचे भव्यदिव्य नियोजन केले आहे.

विलास कटारिया यांनी अतिथींचे स्वागत केले. आदेश चंगेडिया यांनी सन्मानपत्राचे वाचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रसाद बेडेकर यांनी केले. प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज यांच्या मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.



गुरुवाणी - १११

गुरूला कधीही विसरायचे नाही

प्रत्येकाने अंतर्मनात संकल्प केला पाहिजे की, 'मी गुरूला कधी विसरणार नाही'. जो गुरूला विसरतो तो गुंडा होतो. जो गुरूला आठवणीत ठेवतो तो अर्जुन बनतो, इंद्रभूती गौतम बनतो. तुम्ही गुरूपेक्षा ज्ञानी झालात तरी गुरू हा गुरूच असतो. त्यांना कधी विसरू नका. आपल्या पेक्षा कोणी ज्ञानी भेटला तर त्याचा द्वेष नाही करायचा. कधीही ज्ञानीशी ईर्षा नाही करायची. कधीही कोणाच्या ज्ञानार्जनाच्या मार्गात आडकाठी आणायची नाही. संकल्प करा, मी कधी माझ्या गुरूंना विसरणार नाही. कोणाच्याही शिक्षणाच्या आड येणार नाही. जो ज्ञानी आहे, त्यांची भक्ती करा, प्रेम करा. केवल ज्ञान सर्वांना होऊ शकते. जे सगळ्यांचे ध्येय असते. माझ्याकडून कळत नकळत ज्ञानाची, ज्ञानीची अवमानना झाली असेल तर मी क्षमा मागून भविष्यात असे होणार नाही असा संकल्प करतो. नगरकर भाग्यवान आहेत कारण येथे प्रवर्तकश्रीजी पूज्य कुंदनऋषीजी म.सा. विराजमान आहेत. त्यांचा ९३ वा जन्मोत्सव साजरा करण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. खरं तर त्यांना पुणे संघाकडून निमंत्रण असते. पण त्यांना आपल्या गुरूदेवांच्या भूमीतच राहायचे आहे. गुरूदेवांच्या पावन भूमीतच अखेरचा श्वास घेण्याचा त्यांचा निश्चय आहे. गुरूदेवांचा ईद त्यांची अतूट भक्ती त्यांना नगरमध्ये थांबवते. मी नेहमी सांगतो की, आचार्य भगवंत गुरूदेवांच्यानंतर प्रवर्तकश्रीजींनीच मला अपार वात्सल्य, प्रेम दिले आहे. त्यांचा माझ्यावर अतूट विश्वास आहे. काही कारणांनी मी महाराष्ट्रात कधीही न येण्याचा निश्चय केला होता. मी कुठेही असलो तरी प्रवर्तकश्रीजी माझी तितक्याच प्रेमाने माझी काळजी करायचे. मला सगळे कळायचे. ते अतिशय प्रेमळ आहेत. त्यांचे अंतरंग मी जाणून आहे. त्यामुळे त्यांची आज्ञा माझ्यासाठी खूप मोठी असते. प्रवर्तकश्रीजींच्या आग्रहामुळे मी महाराष्ट्रात परत आलो. त्यांच्यावर माझी आस्था आहे. ते माझे उपकारी आहेत. गुरूदेवांवरील नितांत श्रद्धा आणि प्रवर्तकश्रीजींचा आग्रह मला नगरला घेऊन आला. चातुर्मासात त्यांचे मोठे सान्निध्य लाभले आहे. ते कायम स्वस्थ राहून त्यांचे मार्गदर्शन मिळत राहो हीच मंगल भावना. जैन परंपरेत उपवास कठिणच असतात पण आयंबिल तप हे खूप कठीण असते. याकाळात स्वादिष्ट आहार अजिबात घेता येत नाही. कोरडा आहार घ्यावा लागतो. वयाच्या ७२ व्या वर्षी हे कठिण तप करणाऱ्या अपूर्वज्योतीजी म.सा. यांना 'तपोमूर्ती' उपाधीने अलंकृत करण्यात येत आहे.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



दिवाळीनिमित्त मुनोत इस्टेट येथील सिद्धी कुणाल मुथियान हिने साकारलेली आकर्षक रांगोळी.

नगरमध्ये १५ नोव्हेंबरला एक कुटुंब, एक किल्ला महास्पर्धा

नगर – अहिल्यानगर महानगर– पालिका आणि धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही एक कुटुंब, एक किल्ला बनवा महास्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १५ नोव्हेंबर रोजी बुरुडगाव रोडवरील साई उद्यान येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी लहान गट, तर इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठा गट अशी विभागणी करण्यात आली आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला सायकल, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्याला स्मार्ट वॉच, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्याला आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या किल्ले बनवा स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी केले आहे.

किल्ले बनवा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाची ओळख होणार आहे. किल्लूयांची निर्मिती करताना विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम आणि ऐतिहासिक वारसा समजण्यास मदत होईल. आजच्या पिढीला छत्रपतींचा इतिहास आणि त्यांच्या कार्याची माहिती व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबासह या स्पर्धेत सहभाग नोंदवून ऐतिहासिक वारसा जपण्याच्या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



दिवाळीनिमित्त कॅमल साबूदानाचे व्यापारी अशोक बन्सीलाल पारख यांच्या घरी सौ. मीनल पारख व दिव्या पारख यांनी १४ बाय १० फुटाची रांगोळी साकारली.

पिंपळगाव माळवी तलावातून पाण्याचा बेकायदेशीर उपशा विरोधात तक्रार केल्यामुळे तरुणासह वडिलांना टोळक्याने मारहाण करत लुटले

नगर – महापालिकेच्या मालकीच्या पिंपळगाव माळवी (ता.नगर) येथील तलावातून पाण्याच्या बेकायदेशीर उपशाबाबत शासकीय कार्यालयात तक्रार केल्याच्या रागवरून काही जणांनी एका तरुणाला आणि त्याच्या वडिलांना रस्त्यात अडवून लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. तसेच आरोपींनी फिर्यादीच्या खिशातील १० हजार ५०० रुपयांची रोख रक्कम आणि हातातील सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांसह अनोळखी ३–४ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गोरक्षनाथ भाऊसाहेब आढाव (वय ३०, रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. १० नोव्हेंबर रोजी रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हे त्यांचे वडील भाऊसाहेब एकनाथ आढाव यांच्यासह गावातील कासाई शिंदे यांच्याकडे कामानिमित्त गेले होते. तिथून परत येत असताना आढाववाडी अमरधामसमोर योगेश भाऊसाहेब झिने, संतोष रामदास झिने, नितीन सोपान झिने आणि त्यांच्यासोबत तोंडाला बांधलेले ३ ते ४ अनोळखी इसम भेटले.

त्यांनी फिर्यादीला तुम्ही गावातील तलावातील पाण्याच्या मोटारी आम्ही टाकल्याबाबत वरिष्ठ कार्यालय यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, असे म्हटले. त्यावर फिर्यादीने त्यांना तुम्ही पाण्याचा अवैध उपसा करू नका, आपल्याला भविष्यात पाण्याची गरज पडणार आहे, असे समजावल्याचा राग आल्याने आरोपींनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. योगेश झिने व संतोष झिने यांनी लाकडी दांडक्याने मारहाण केली, तर नितीन झिने व इतर अनोळखी जणांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या दरम्यान आरोपींपैकी काहींनी फिर्यादीचे वडील भाऊसाहेब यांना पकडून ठेवले होते.

मारहाणीदरम्यान संतोष रामदास झिने याने फिर्यादीच्या खिशातील १० हजार ५०० रुपयांची रोकड बळजोरीने काढून घेतली. तसेच योगेश भाऊसाहेब झिने याने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या बोटातील अर्धा तोळा वजनाची सोन्याची अंगठी बळजबरीने ओढून घेतली. दरम्यान, नितीन सोपान झिने याने तुझ्या डोक्यात दगड घालून मारीन अशी जीवे मारण्याची धमकी दिली. परिसरातील लोक जमा होऊ लागल्याने सर्वजण तिथून पळून गेले. या हल्ल्यात जखमी झालेल्या गोरक्षनाथ आढाव यांना दुसऱ्या सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११४(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक खिळदकर करत आहेत.

रिलायन्स स्मार्ट बाजार चोरीतील २ आरोपींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या; ८.२४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत, जुनाच कर्मचारी निघाला मास्टरमाइंड



नगर – नगर शहरातील सावेडी येथील रिलायन्स स्मार्ट बाजार फोडून रोख रक्कम लंपास करणाऱ्या चोरांचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांतच छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी २ आरोपींना बेड्या ठोकून तब्बल ८ लाख २४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.


९ नोव्हेंबर रोजी सावेडीच्या रिलायन्स स्मार्ट बाजारच्या सर्व्हर रूमची खिडकी आणि काच फोडून अज्ञात चोरांनी वॅश रूममधील तिजोरी सुरक्षितपणे तोडली आणि ४ लाख ६६ हजार ३९० रुपयांची रोकड लांबविली होती.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिल्यानंतर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड आणि पोलीस अंमलदार संदिप पवार, शाहीद शेख, सागर ससाणे, बाळासाहेब गुंजाळ, फुरकान शेख व प्रशांत राठोड यांच्या पथकाला तपासाकामी रवाना केले

तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी विशाल अंशाबापू चेमटे (वय ३२,रा. मनोनिलानगर, बोल्हेगाव) आणि सुधीर दिनकर घोडके (वय ३९, रा.मातोश्री अपार्टमेंट, पवननगर, भिस्तबाग, सावेडी) यांना ताब्यात घेतले. तपासात आरोपी विशाल चेमटे हा दोन वर्षांपूर्वी याच रिलायन्स स्मार्ट बाजारमध्ये कामाला होता, हे निष्पन्न झाले. त्याला दुकानातील पैशांच्या व्यवहाराची खडानखडा माहिती होती. आरोपींनी रेनॉल्ड कंपनीची क्विड कार व यामाहा मोटारसायकलवरून येऊन हा गुन्हा केल्याची माहिती दिली.

ताब्यातील आरोपींना मुद्देमालासह तोफखाना पोलीस ठाण्यात हजर केले असून, गुन्ह्याचा पुढील तपास तोफखाना पोलीस स्टेशन करीत आहे.

हद्दपारीच्या आदेशाचा भंग करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी पकडले



नगर – अहिल्यानगर शहरातून एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आलेला सराईत आरोपी हद्दपारीच्या आदेशाचा भंग करून शहरातच वावरत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने झेंडीगेट परिसरात त्याला जेरबंद केले आहे. सरवर अस्लम शेख उर्फ भिम्या (वय ३५, रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे आणि दीपक जाधव यांना अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या इसमांचा शोध घेऊन ते मिळून आल्यास त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार १३ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात हद्दपार आरोपींची पडताळणी करत असताना, सरवर अस्लम शेख उर्फ भिम्या (रा. झेंडीगेट, अहिल्यानगर) हा झेंडीगेट येथील पाण्याच्या टाकीजवळ थांबल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ झेंडीगेट परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ सापळा रचून सरवर अस्लम शेख उर्फ भिम्या (वय ३५, रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर) यास ताब्यात घेतले. त्याच्या हद्दपार अभिलेखाची खात्री केली असता, त्याला १ ऑगस्ट २०२६ रोजीपासून अहिल्यानगर शहराच्या हद्दीतून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले असल्याचे निष्पन्न झाले. असे असतानाही तो न्यायालयाच्या व प्रशासनाच्या आदेशाचा भंग करून बेकायदेशीरपणे अहिल्यानगर शहरात फिरत असल्याचे स्पष्ट झाले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे शहर परिसरात २१ ठिकाणी आगीच्या घटना; महापालिका अग्निशमन विभागाच्या तत्परतेने जीवित व वित्त हानी टाळण्यात यश

नगर – दिवाळी सणाच्या कालावधीत फटक्यांमुळे राज्यात अनेक ठिकाणी आगीच्या दुर्घटना घडून अनेकांना आपले जीव गमवावे लागले, तर बऱ्याच ठिकाणी मोठ्याप्रमाणावर वित्त हानी झाली, अनेक घरे, दुकाने आगीत भस्मसात होवून मोठे आर्थिक नुकसान झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत, नगर शहर परिसरातही फटक्यांमुळे सुमारे २१ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत मात्र महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या सतर्कतेने शहरात कोठेही जीवित हानी किंवा मोठ्या प्रमाणावर वित्त हानी झाली नसल्याची माहिती महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली आहे.

दीपावली निमित्त अहिल्यानगर शहरात परिसरात सिद्धार्थनगर, बाल भवन जवळ, गवत व कचऱ्याला आग लागली होती, जुने सिव्हिल हॉस्पिटल, बागडे पट्टी येथे एका दुकानाला, सिटीझन कॉलनी, भिंगार, नारळाच्या झाडाला) ॲबट पेट्रोल पंप, लालटाकी येथे भंगार दुकानाला, पत्रकार कॉलनी, माणिकनगर येथे नारळाच्या झाडाला, नगर कल्याण रोड, रेल्वे ब्रिज जवळ, ओपन स्पेस मधील गावताला, गुलमोहर रोड, पारिजात चौक येथे गावताला, डि मार्ट समोर, पान टपरीला, बालिकाश्रम रोड, न्यूक्लिअस हॉस्पिटल समोर, मकासरे हेल्थ क्लब, प्रोफेसर चौक, माळीवाडा, भापकर हॉस्पिटल शेजारी, भाऊसाहेब फिरोदया हायस्कूल समोर, तारकपूर, झुलेलाल मंदिर, आहुजा क्लेनीक शेजारी, जिल्हा परिषद जवळ बस स्टॅन्ड समोर, सारडा कॅन्टीन मागे, सिव्हिल हॉस्पिटल समोर, सम्राट इलेक्ट्रिक समोर, बागड पट्टी, तपोवन रोड, सूर्यनगर, मारुती मंदिर समोर, शंकर महाराज मठा जवळ श्री. बोराटे यांच्या घरा जवळ, जामगांवकर ज्वेलर्स, गंज बाजार, टेरेस वरील टॉवर ला लागलेली आग, रामवाडी, एसटी वर्क शॉप जवळ, ठाणगे मळा, नेप्ती नाका चौक, बाळाजी बुवा विहिरी जवळ लाकडाला लागलेली आग, वारूळाचा मारुती रोड येथील गार्डन वेस्ट ला लागलेली आग.

अशा ऐकून २१ ठिकाणच्या संध्याकाळी साडे सात ते पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास या आंगी लागल्या, यातील १९ ठिकाणी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी तर २ ठिकाणी आंगी लागल्या होत्या. मात्र महापालिकेच्या माळीवाडा आणि सावेडी येथील पथकांनी तातडीने त्या ठिकाणी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवून जिवित व वित्त हानी वाचवली असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.





बॉलर्स क्लब या आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान गांधी आणि ॲड. हर्षल शेलोत सचलित बास्केटबॉल प्रशिक्षण केंद्र यांच्या आयकॉन स्कूल येथील मैदानाची दिवाळी निमित्त पूजा करुन आकर्षक रोषणाई करण्यात आली. या वेळेस त्यांच्यासह उपस्थित खेळाडू.

पाहिजेत
जुना बाजार येथील होलसेल मेडिकलमध्ये
मुली- ५ | मुले ५
पार्ट टाईम दुपारी १ ते ३
मुले -३
पार्ट टाईमसाठी स्वत:ची मोटारसायकल आवश्यक
9975408608

पाहिजेत
सिटी आणि MIDC साठी
ड्रायव्हर पाहिजे
पगार Rs.१८०००/- गरजू पाहिजे
ट्रान्सपोर्टसाठी
ऑफिस स्टाफ पाहिजे
कॉम्प्युटर नॉलेज पाहिजे
अनुभव असला पाहिजे
9881373079

पाहिजेत
माळीवाडा परिसरातील दवाखान्यात काम करण्यासाठी
Female-2
(असिस्टंट व रिसेप्शनिस्ट)
8390907414

चाहिए
अहिल्यानगर शहर और एमआयडीसी के लिए
सिक्युरिटी गार्ड व हाऊस किंपीग चाहिए
(महिला/पुरुष)
6386633129
7020839133

भाड्याने देणे
2BHK फ्लॅट
फर्निचर व पार्किंगसह
2BHK बंगलो
विकणे
2BHK फ्लॅट व रो-हाऊसेस
सारसनगर, अहिल्यानगर
9405571292

भाड्याने देणे
एम जी रोड,
प्राईम लोकेशनवर
३ मजली
दुकान भाड्याने देणे आहे.
9588412500

भाड्याने देणे
दुकान भाड्याने देणे आहे.
१०० स्क्वेअर फूट
(गोडावून, ऑफिस भाजीपाला, फॅब्रिकेशन, सलून इ. करिता)
भुतकरवाडी, मारुती मंदिराशेजारी, सावेडी रोड अहिल्यानगर
8668358192

गाळा भाड्याने देणे
स्टेशन रोड सक्कर चौक, अहिल्यानगर येथे
१२×२५ चा गाळा
ट्रॅव्हल्स एजन्सी, पार्सल बुकींग, कुरिअर सेवा, महा-ई सेवा केंद्र
भरपूर पार्किंगसह
9422411144

बदली ड्रायव्हर मिळेल
अनुभवी आणि निर्व्यसनी
ड्रायव्हर मिळेल
सुदर्शन छल्लानी 7020899146

Secure Vision Surveillance System Pvt. Ltd.
Ushadevi Doke Tower
Zopadi Canteen Ahilynagar
रात्रीचे कॉम्प्युटर कामासाठी मुले पाहिजे
ज्यांनी प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थी व दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना प्राधान्य
Contact
9881023753

पाहिजेत
डिलीव्हरी बॉय
(३ जागा)
ऑफिस वर्कसाठी मुली
(२ जागा)
9557058444

त्वरित विकणे
नंदादिप हॉल, हिरवेगल्ली, सुंदर, शांत, हवेशीर परिसर
ग्राऊंड फ्लोअर
2 BHK फ्लॅट विकणे आहे.
9762619768

भाड्याणे देणे आहे
बालिका आश्रमरोड महालक्ष्मी उद्यान समोर असलेले १२ X १५ फुटाचे २ गाळे किंव्हा दोन्ही मिळुन एकच गाळा ,डॉ. क्लिनीक, बँक,पतसंस्था, ऑफिस, गोडाऊन,कॅफे, हॉटेल इ.साठी भाड्याणे देणे आहे
संपर्क
9975672401

व्यावसायिक जागा भाड्याने देणे
आपल्या व्यवसायासाठी उत्तम संधी!
खालील जागा भाड्याने उपलब्ध आहेत.
१. ऑफिस स्पेस – ८०० स्क्के.फुट
२. व्यावसायिक जागा – ३००० स्क्के.फुट
३. गाळा – ७०० स्क्के.फुट
हॉस्पिटल, बँक,जिम, मिनी मॉल, इत्यादींसाठी योग्य.
आपल्या व्यवसायासाठी उत्तम लोकेशन
मकासरे ईस्टेट, मार्केटयार्ड रोड, अहिल्यानगर.
9850204416/ 9689600641



बाळांच्या वजन, उंची, भूक व प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आजच भेट द्या.
सन-२०१० पासून
चिरायु
लहान मुलांचे क्लिनिक
(जन्मापासून ते १८ वर्षापर्यंत)
प्रसिध्द बालरोग तज्ञांचा सल्ला
शाखा १ – सबजेल चौक, तुळजाभवानी मंदिरासमोर (डायमंड बेकरी समोर) अहिल्यानगर
9527931384 / 8830400170

ज्वेलर्स दुकानासाठी पाहिजेत
अकौंटंट
अनुभवी सेल्समन
(पगार-१६०००रु. पासून पुढे +इन्सेंटिव्ह)
-संपर्क-
अशोकलाल हस्तीमल मुथ्था (सराफ)
सराफबाजार, अहिल्यानगर
7083031950

पाहिजेत
त्वरीत अनुभवी
ड्रायव्हर व हेल्पर पाहिजे
४०७, ७०९,९०९ जनरेटर व्हॅन साठी समक्ष अर्जासह भेटावे
श्री स्वामी समर्थ जनरेटर्स अँड इलेक्ट्रिकल्स
पंचवटी नगर, नवनाथ नगर जवळ बोल्हेगाव अहिल्यानगर
9881825551

पाहिजेत
दिपक एजन्सी/रेडिमेड्स, केडगाव, अहिल्यानगर येथे ॲप डेव्हलपमेंट क्षेत्रात काम करण्यासाठी पूर्णवेळ उमेदवार पाहिजे आहेत.
9356463500

गाळा भाड्याणे देणे आहे
स्वस्तिक चौक गणेशवाडी येथील कल्पना पॅलेसमधील २३० स्क्वेअर फुटाचा गाळा व बस स्टॉण्डपासुन जवळ स्वस्तीक चौकातील (३५२ स्क्वे.फूट) १६ X २२ ग्राऊंड फ्लोअरची जागा गोडाऊनसाठी भाड्याणे देणे आहे
संपर्क :-
9890027068


गाळा भाड्याने देणे आहे
पत्ता- मोरया सांस्कृतिक केंद्रासमोर गुरुप्रसाद अपार्टमेंट पाईपलाईन रोड, अहिल्यानगर
9890924259
9503030443

Best Location for your business !
5 FLOOR BULDING AVAILABLE FOR LEASE
Prime Location | Highway Touch | Front Parking
Construction: 7000 Sq.ft. + Open Plot: 4200 Sq.ft.
Suitable for :
Hospital | Hotel, Lodging, Open Garden & Roof Top Restaurant | 2 Wheeler Showroom & Service Station | Marble, Tiles & Plumbing Showroom | Lifestyle & Fashion Brands | Jewellers
Amenities
- Lift
- Washrooms
- Staircase
- Light & Ventilation
- Water Supply



Address: Guru Furniture, Mangatram Heights, Near Fun Ki Land, Beside Neuron Plus Hospital, Manmad Highway, Ahilyanagar
Call / WhatsApp: 94 2222 33 44

अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध!
* अत्याधुनिक मोतीबिंदू (Phaco) शस्त्रक्रिया * चष्मा काढण्यासाठी लेसर उपचार (LASIK)
* केरॅटोकोनससाठी C3R उपचार कॉर्निया प्रत्यारोपण (Corneal Transplant)
* कॉर्नियावरील जखम व संसर्गाचे उपचार * प्टेरिजियम (डोळ्यावरील मास) शस्त्रक्रिया
* काचबिंदू (Glaucoma) तपासणी व उपचार
* रेटिना इंजेक्शन उपचार * तिरळेपणा शस्त्रक्रिया
* संगणकीकृत नेत्र तपासणी व चष्म्याचा नंबर



सर्व प्रकारच्या डोळ्यांच्या आजारांवर आधुनिक व तज्ञ उपचार
या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर
डॉ.सौ.नलिनी गिते (महिंद्रकर) नेत्र व कॉर्निया तज्ञ / मोतीबिंदू तज्ञ
MBBS, MS (Ophthalmology) FGO, FCRS (H.V. Desai Eye Hospital, Pune)
अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व प्रसुतिगृह
गीते हॉस्पिटल, बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर Mo : 9257575714

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

सातवे पुण्यस्मरण



ना ध्यानी ना मनी
तुम्ही गेलास आम्हास सोडूनी येते
डोळ्यात निरंतर पाणी
उणीव तुमची भासे
हरदिन क्षणोक्षणी !
कै. तुकाराम छबु सोन्निस
स्व.दि. १४/११/२०१९
आपल्या पावन स्मृतीस शतपूर्ण श्रध्दांजली
- दु:खांकित -
सुनिल तुकाराम सोन्निस (मुलगा) | संजय तुकाराम सोन्निस (मुलगा)
सौ. मंगल रविंद्रनाथ मोरे (मुलगी) | सौ. मंजुषा शरद सावदेकर (मुलगी)
सौ. रंजना राजेंद्र सावदेकर (मुलगी) | सौ. सविता संजय सोन्निस (सुन)
अनुप सुनिल सोन्निस (नातु)

जाहीर नोटीस
तमाम नागरीकांस या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही फुलसुन नुरलीधर शिंदे, मिलींद नुरलीधर शिंदे, मनिष नुरलीधर शिंदे व मनोज नुरलीधर शिंदे यांचे मालकीची होती. सदर मिळकतीवर फुलसुन मुरलीधर शिंदे, मिलींद मुरलीधर शिंदे, मनिष मुरलीधर शिंदे व मनोज नुरलीधर शिंदे यांनी क्वॉलीटी किराणा या फर्मचे सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा लक्ष्मी कारंजा, अहिल्यानगर या बँकेच्या कर्जासाठी खालील परिशिष्टातील मिळकत गहाणतारण दिली होती सदर क्वॉलीटी किराणा या फर्मने सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा लक्ष्मी कारंजा , अहिल्यानगर यांचे कर्जाची परतफेड वेळोवेळी संधी देऊनही केली नाही व याबाबत ची माहीती वरील कर्जदार व जामिनदार यांना देऊनही कर्ज परतफेड केली नाही. त्यामुळे सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा लक्ष्मी कारंजा, अहिल्यानगर यांनी SARFAESI रोखीकरण व वित्तीय्यमत्तेची पुर्नरचना आणि प्रतिभुती हित संभंधाची अंमलबजावणी अधिनियम २००२ अन्वये कारवाई करुन सदर परिशिष्टात नमुद मिळकतीचा ताबा दिनांक १५/०९/२०२१ रोजी प्रत्यक्ष घेऊन सदर कायान्वये सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा लक्ष्मी कारंजा, अहिल्यानगर यांनी खाली परिशिष्ट मिळकत जप्त करुन लिलावाद्वारे विक्रीस काढली असता आमचे अशिलाने लिलावात भाग घेऊन जास्तीत जास्त रकमेस सदर मिळकत घेण्याची तयारी दर्शवली त्याप्रमाणे सदर लिलावात आमचे अशिलास त्याचे बोलीप्रमाणे सदर मिळकत विक्री करण्याचे सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा लक्ष्मी कारंजा, अहिल्यानगर यांनी निश्चित करुन लिलाव बोलीच्या काही टक्के रक्कम सेंट्रल बँकेने भरुन घेऊन उर्वरीत रक्कम भरण्यासाठी नियमाप्रमाणे मुदत दिलेली आहे.

त्याप्रमाणे लिलावाची उर्वरीत रक्कम भरुन आमचे अशिल सदर खरेदी व्यवहार पुर्ण करणार आहेत. सदर मिळकतीवर दि अहमदनगर मर्चन्टस को ऑप बँक लि. मार्केट यार्ड, अहिल्यानगर तसेच किसान ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. निमगांव घाणा व अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यांचे व्यतीरीक्त कोणत्याही बँकेचा अथवा वित्तीय संस्थेचा कोणत्याही स्वरुपाचा बोजा नसुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन वा जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जमी, बँक बोजा, भाडेकरार, साठेखत, नदार, मनाई हुकूम, त्यागीती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत त्यांचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबतच्या कागदोपत्री पुराव्यानिशी ॲडव्होकेट यांचेकडे या व्यवहारास लेखी हरकत नोंदवावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरुन आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील मग कोणचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत ग्राह्य धरली जाणार नाही,याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन :-
१. डी.।। सर्व डी.।। व तालुके नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सि.स नंबर १६२१चे क्षेत्र ७६.९० चौ.मी. व सि.स. नंबर १६२२चे क्षेत्र ३५.९०चौ.मी.
यांसी चतु:सिमा
१. सि.स.नं. १६२१
पुर्वेस : गल्ली दक्षिणेस : सि.स.नं. १६२२
पश्चिमेस : सदीजंग यांची मिळकत उत्तरेस : सि.स.नं. १६२०
२. सि.स.नं. १६२२
पुर्वेस : गल्ली दक्षिनेस : सि.स.नं. १६२१
पश्चिमेस : सदीजंग यांची मिळकत उत्तरेस : सि.स.नं. १६२३
येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक संपूर्ण मिळकत तदंगभुत वस्तु, त्यावरील बांधकाम, वहिवाट, वागणूकीचे, जाणेयेणेचे हक्कासह तसेच त्यामधील असलेल्या इतर हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.
दिनांक १४/११/२०२६, अहिल्यानगर

ॲड. विनोद नामदेवराव गायकवाड (बीएसएलएलएलबी)
ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी पब्लीक,
ऑफिस बी-१, गणराज अपार्टमेंट, जुने जिल्हा न्यायालयासमोर, दादाचौधरी शाळेशेजारी, अहमदनगर. मो.नं. ९८२२०४३१२३

साई होम सर्व्हिस मसाज
घरी येऊन प्रोफेशनल पद्धतीने घरी येऊन
फुलबॉडी मसाज करून मिळेल
Full Body Massage
(प्रोफेशनल फुलबॉडी मसाज ४९९ Rs. only)
9850127508
8830275190

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१.सकलेन इकबाल काझी, २. सैफ इकबाल काझी दोघेही रा. ६५००, भाकरे गल्ली, सर्जेपुरा, अ.नगर** यांच्या मालकी बहिवाटीची असून, सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, तावा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन:- जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	चौ.मी
३४१/३	६२	२३२.००

वापैकी लिहून देणार यांच्या संपूर्ण मालकीचा दक्षिणेकडील बाजुचा १३९.४० चौ.मीटर प्लॉट व त्यावरील, मंजूर प्लॅनप्रमाणे बांधकाम क्षेत्र २११.७८७ चौ.मीटर बांधकाम, त्यामधील असलेल्या वोअरवेल मोटरसह, लाईट मीटर, आहे त्या चालू बांधकामच्या स्थितीत संपूर्ण मिळकत.

यासी चतु:सिमा-
पुर्वेस- रोड, दक्षिणेस- प्लॉट नं. ६३
पश्चिमेस- प्लॉट नं. ५९ उत्तरेस- प्लॉट नं. ६२ पैकी
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखून न ठेविता.

ॲड. तनवीर एम.शेख नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ॲड. फरहान आसिफ शेख
कस्तुरी प्लाझा शेजारी, डाबरे गल्ली, अहमदनगर मो.नं.९२७०४६४६००/ ९७६६१४५९३२

जाहीर नोटीस
तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,
जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगाव येथील स. नं. २०२/२/४ चा हिस्सा नं. ३१ पैकी १ प्लॉट नं. ३१ चे एकुण क्षेत्र ११७.७२ चौ.मी. हा बिनशेती प्लॉट यांसी चतु:सिमा पुर्वेस- प्लॉट नं३० दक्षिणेस-ओपन स्पेस, पश्चिमेस ९ मी. रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ३२ आणि २ स.नं. २०२/२/४ चा हिस्सा नं.२५ पैकी प्लॉट नं.३२ चे एकुण क्षेत्र ७२.१३ चौ.मी. हा बिनशेती प्लॉट यांसी चतु:सिमा पुर्वेस- प्लॉट न.२९,दक्षिणेस-प्लॉट नं. ३१, पश्चिमेस - ९ मी. रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं.३३ येणेप्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत.
वरील प्लॉट आमचे अशिल यांनी जमीनीचे विद्यमान मालक श्री.मनोज अभिमन्यू येरकळ रा.प्लॉट नं.२४,लिंकरोड, माधवबाग रोड,शिवाजीनगर, केडगाव,अहिल्यानगर यांचेकडुन कायमखुश खरेदी घेण्याचे ठरवून मालका बरोबर व्यवहार केलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजारहीत असून विद्यमान मालकांना सदर मिळकत विक्री करण्याचा अधिकार आहे. अशी खात्री व भरवसा आमचे अशिलास दिलेला आहे. सबब सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा खरेदी, गहाण, दान, बक्षिस, जामीनकी, अन्नवस्त्राचा करार, साठेखत, हक्क व अधिकार हितसंबंध वारसा हक्क, इजमेंटरी राईटस,दावा मनाई हुकूम, अव्वल जमी, चार्ज नजर गहाण, अदलाबदल लेख, अथवा कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांचे असलेले हक्क व हित संबंधाबाबत कागदपत्रांसह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत लेखी कळवावे. सदर मुदतीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदरहु मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क,.अधिकार व हितसंबंध नाही, अगर संबंधितांनी सदरचा हक्क जाणीवपुर्वक सोडुन दिला आहे असे गृहित धरुन आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही तक्रार, हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.
अहमदनगर, दि. १४/११/२०२६
ॲड. फारुक एच. शेख (तांबोळी) (बी.कॉम.एल.एल.बी)
खरेदी घेणार तर्फे
७५८७, पांचपीर चावडी, महिला बँकेसमोर, अहमदनगर मो. ८२०८०४६७३९



भारताचे पहिले पंतप्रधान
पंडीत जवाहरलाल नेहरू
यांच्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन




ज्येष्ठ समाजसेवक,
मा.श्री.अविनाश देडगावकर
अहिल्यानगर

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **१. पुरुषोत्तम खेताजी पटेल, २. वसंत पुरुषोत्तम पटेल, दोघेही रा. गणेशवाडी, स्टेशनरोड, अ.नगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन त्यांना सदर मिळकत विक्री करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. तसेच व्यवहारापोटी विसार म्हणुन आमचे अशिला कडुन रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याचे विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर प्लॉट मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, तावा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.
परिशिष्ट - मिळकत वर्णन : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, मौजे केडगांव येथील बिगरशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -
सर्व्हे नंबर ६०/१/२/३ मधील प्लॉट नं. २ चे क्षेत्र ४२०.०० चौ.मीटर हा संपूर्ण प्लॉट.
यांसी चतु:सीमा - पूर्वेस : ६ मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस : प्लॉट नं. ३
पश्चिमेस : १२ मीटर रुंदीचा रस्ता उत्तरेस : प्लॉट नं. १
दि.१४.११.२०२६
अहमदनगर
ॲड. सविन आसाराम भोजने नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ॲड. प्रियंका अण्णासाहेब खाटेकर
पत्ता - सावेडी, अहिल्यानगर, मो. नं. ८७८८५५४२२९, ९४०५०३५८२९

अॅडव्हान्स बुकिंग सुरू
MY CINEMA
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow



Show - 7/11/2026 to 12/11/2026
RAMAYANA (2D) - 7:30, 8:00, 8:45, 11:00, 11:30 am, 12:15, 2:30, 3:00, 3:45, 6:00, 6:30, 7:15, 9:30, 10:00, 10:45 pm,
RAMAYANA (3D) - 8:30 pm, 12:00, 3:30, 7:00, 10:30 pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 15 नोव्हेंबर 2026



रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 03:30 PM
08:45 AM 05:30 PM
10:00 AM 07:15 PM
11:45 AM 08:00 PM
12:30 PM 09:15 PM
01:45 PM 11:00 PM
11:35 PM
रामायण ३ डी (हिंदी)
10:45 AM 06:15 PM
02:30 PM 10:00 PM
आधी अनंत (मराठी)
04:45 PM



Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : ७,८,९ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



७ नोव्हेंबर 2026
SCREEN - 1 SCREEN - 2
10.00 AM 230/- 09.00 AM 180/-
02.00 PM 250/- 01.00 PM 200/-
06.00 PM 330/- 05.00 PM 280/-
10.00 PM 330/- 09.00 PM 280/-
८ नोव्हेंबर 2026
SCREEN - 1 SCREEN - 2
09.00 AM 230/- 09.00 AM 180/-
01.00 PM 250/- 01.00 PM 200/-
05.00 PM 330/- 05.00 PM 280/-
09.00 PM 330/- 09.00 PM 280/-
९ नोव्हेंबर 2026
SCREEN - 1 SCREEN - 2
08.00 AM 230/- 09.00 AM 180/-
11.30 PM 250/- 01.00 PM 200/-
03.00 PM 330/- 05.00 PM 280/-
06.30 PM 330/- 09.00 PM 280/-
10.00 PM 330/-
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर